**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**(दिनांक 17.02.2018 ची सर्वानुमते तहकुब करण्यात आलेली)**

**बुधवार**, दिनांक 07.03.2018 रोजी दुपारी 12.00 वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या शंकररावजी चव्हाण सभागृहात भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स. सदस्य उपस्थित होते.

**मा. सौ. भवरे शिलाबाई किशोर, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| पाटील विनय विश्वांबर | राऊत दिपक नरहरी |
| कल्याणकर ज्योती किशन | कल्याणकर बालाजी देवीदास |
| कदम ज्योती मनिष | तुप्पेकर संगीता सखाराम |
| मुळे कवीता संतोष | देशमुख सतीश पुंडलीकराव |
| पवळे उमेश देवराव | पुरी कौशल्या शंकर |
| कोकाटे करुणा भीमराव | गाडीवाले संदिपसिंघ शंकरसिंघ |
| वाघमारे दयानंद नामदेव | स्वामी शैलजा किशोर |
| चव्हाण आनंद शंकरराव | पिंपळे महेंद्र हिरामन |
| पावडे जयश्री निलेश | नेरलकर अपर्णा ऋषीकेश |
| खान फारुख अली इलयाज खाँ | यन्नम राजेश लक्ष्मीनारायण |
| देशमुख वैशाली मिलींद | रायबोले ज्योती सुभाष |
| पाटील संगीता विठ्ठल | सोनाळे दुष्यंत गणेशराज |
| येवनकर मोहिनी विजय | खान सलीमा बेगम नुरुल्ला खान |
| गड्डम नागनाथ दत्तात्रय | स्वामी किशोर मल्लीकार्जून |
| गाडीवाले मनमितकौर नरेंद्रसिंघ | गजभारे बापुराव नागोराव |
| शहाणे अल्का जगदीश | पवार जयश्री परमेश्वर |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | सय्यद शेर अली अ. महेबुब अली |
| खान म. मसुद अहेमद खान उस्मान खान | अब्दुल सत्तार अ. गफुर |
| अरशीया कौसर मोहम्मद हबीब | अ. रशिद अ. गणी |
| सोनकांबळे गंगाबाई मल्हारी | कुरेशी रीहाना बेगम चाँद पाशा |
| अब्दुल शमीम अब्दुल्ला साब | मोहम्मद साबेर चाउस मोहम्मद नासेर चाउस |
| अ. लतीफ अ. मजीद | शबाना बेगम मो. नासेर |
| कोकुलवार नागेश गोविंद | कापुरे गितांजली रामदास |
| अ. हफीज अ. करीम | आयेशा बेगम शे. असलम |
| फारुख हुसेन कासीम पिरान | रावत दिपकसिंग काशिनाथसिंग |
| खालसा प्रकाशकौर सुरजितसिंघ | रावत भानुसिंग गयादिनसिंग |
| तेहरा अमीतसिंग गोपालसिंग | हुसेन शोएब मजहर |
| गोडबोले ज्योत्सना राजु | अ. फयीम अ. मुनीर |
| गायकवाड चित्रा सिध्दार्थ | मोरे दिपाली संतोष |
| काळे राजु गोविंदराव | गुपिले बेबी जनार्धन |
| जाधव श्रीनिवास नारायणराव | घोगरे इंदुबाई शिवाजी |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सौ. भवरे शिलाबाई किशोर, महापौर हे होते तसेच मा. श्री गणेश देशमुख आयुक्त, उपस्थित होते.

सुरवातीस नेहमी प्रमाणे वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात येते.

वंदे मातरम हे सामुहिक गित म्हणण्यात आले.

**महापौर** — उपस्थित सर्व स. सदस्य, आयुक्त, अधिकारी कर्मचारी याचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामाकाजास सुरुवात करण्यात येते.

**किशोर स्वामी** — नांदेडचे उदयोगपती व मनपाचे कंत्राटदार श्री गणपतरावजी मोरगे यांचे निधन झालेले आहे सभेत मध्ये त्यांना दोन स्तब्ध राहुन आदरांजली वाहण्यात यावी.

**आनंद चव्हाण** — माझ्या प्रभागातील, हनुमान गढचे मुख्य पुजारी, महंत चरणसिंघ महाराज यांचेही निधन झालेले आहे त्यांनाही श्रंध्दाजली अर्पण करण्यात यावी.

**दिपकसींह रावत** माझे दोनही प्रस्तावास अनुमोदन आहे.

**महापौर** श्री गणपतराव मोरगे कंत्राटराव व हनुमान गढचे मुख्य पुजारी, महंत चरणसिंघ महाराज यांचेही दुखद निधन झाल्यामुळे त्यांना श्रध्दांजली अपर्ण करण्यात येते.

**ठराव.91** **ठराव**

नांदेड शहरातील सुप्रसिध्द कंत्राटदार श्री गणपतराव मोरगे व हनुमान गढचे मुख्य पुजारी श्री महंत चरणसिंघ महाराज यांचे दुखद निधन झाल्यामुळे हयांना श्रध्दांजली अर्पण करण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते.

**सभागृह नेता** नांदेड शहरात येत्या काळात पाणी टंचाई होणार आहे प्रशासनाने काय तयारी केली आहे त्याची माहीती सभेमध्ये देण्यात यावी.

**आयुक्त** मा.महापौर महोदय, सध्या नांदेड शहराचा पाणी पुरवठा सुरळीत आहे परंतू एप्रील मे नंतर काही प्रमाणात पाणी टंचाई उदभवू शकते. आपल्याला वार्षीक जी गरज आहे ती गरज भागु शकते परंतु विष्णुपुरी जलाशयातील पाणी शेतक-यांना देण्यासाठी तीन ते चार पाण्याचे उपशे राज्य शासनाने मान्य केले आहेत. पाण्याचे नियोजन योग्य करण्यासाठी एरीगेशन विभागास त्यांचा अभिप्राय मागविला आहे. त्याप्रमाणे एप्रीलच्या पहील्या आठवडयापासुन दोन दीवस आड पाणी करण्यासाठी मा. महापौर व इतरसर्व पदाधीकारी व सदस्य यांचीशी विचार विनिमय करुन निर्णय घेण्यात येणार आहे. सध्या परिस्थीत पाण्याची आपणास काही टंचाई नाही.

**आनंद चव्हाण** आपण मुंबईला मीटींगला गेले होते त्या मध्ये आपण एरीगेशनला कीती पैसे देत होतो आणि या वर्षी आपणास का दयावे लागणार नाही या बाबतची माहीती सभेस देण्यात यावी. पाण्याची नियोजन काय आहे ही माहीती देण्यात यावी.

**आयुक्त** मा. महापौर महोदय, साधारणतः 10 एमएमक्यु पाणी अतीरीक्त स्वरुपात घेण्याची गरज भासत असते. सर्व साधारणपणे आपण दर वर्षी दीड कोटी रुपये पाण्या करीता भरत असतो. यावर्षी आमची मांडणी अशी होती की आम्हाला जे पाणी लागते ते पाणी आता विष्णुपुरी जलाशयात आहे. तेव्हढ पाणी जलाशयात आहे ते मीळू सुध्दा शकणार आहे. म्हणुन आम्ही पैसे भरण्याची गरज सुध्दा नाही. त्यामुळेच आपणास 10 एमएमक्यु वाढी पाणी पैसे न भरता पाणी मिळणार आहे. यावर्षी जास्त प्रमाणात उन्हाळा असणार आहे याची माहीती मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांनी दिलेली आहे त्यावेळी आपणास पाणी टंचाई होणार नाही याची आपण काळजी घेणार आहोत कारण जुनच्या महीण्यात पावसाचे पाणी कधी येईल याची कोणासही माहीती नसते.

**आनंद चव्हाण** आपण नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे पाण्यासाठीचे पैसे भरावयाचे वाचविले आहे त्यामुळे आपण मनपाचे पैसे वाचवीले त्याबाबत आपले अभिनंदन करण्यात येते.

**दिपकसिंह रावत** भविष्यात पाणी टंचाई होणार आहे असे आता आपल्या बोलण्यावरुन वाटते. मे महीण्यात पाण्याची टंचाई होणार हे निश्चीत आहे. आपण पाणी आरक्षीत करतो ते पाणी धरणातुन सोडण्यात येते त्यावेळी शेतकरी बांधव पाणी विदयुत मोटारी लावून उपसा करीत असतात. त्यावर आळा घालण्यासाठी मनपाचे पथक, जिल्हाधिकारी कार्यालयाचे पथक तयार केले जाते. या पथक कार्यवाही करण्यासाठी गेले की पथकावर हल्ले होत असतात त्याचाही आपणास विचार करावा लागणार आहे. प्रत्येक प्रभागात जवळपास 50 तरी बोर आहेत ते सर्व दुरुस्त करुन घेणे गरजेचे आहे आपल्याकडे एमआरसी नियुक्त नाही त्यामुळे हे पम्प दुरुस्त करुन घेणे आवश्यक आहे. एमआरसी नियुक्त होईपर्यंत उप अभियंता, कार्यकारी अभियंता यांना अधिकार देण्यात यावे. जेणेकरुन टंचाईच्या काळात पाणी सर्वांना मिळेल.

**आयुक्त** निश्चीतच टंचाईच्या काळात पाणी मिळाले पाहीजे यासाठी शहरातील सर्व हात पम्प व विदयुत पम्प दुरुस्त करण्यात येतील.

**महेंद्र पिंपळे** काही मनपाचे आपले अधीकारी व प्लबंर हे एकाच घरात दोन दोन नळ देत आहेत जी पाण्याची 24 तास लाईन आहे तीला जोडणी करुन पाणी देण्याचे काम होत आहे. मी यापुर्वी 5 ते 7 पत्र देवून तक्रार केली आहे अवैदय नळ जोडणी आहे ती तात्काळ थांबवीण्यात यावी परंतू माझ्या पत्रावर कार्यवाही झालेली नाही आणि मला उतरही मीळाले नाही.

**बालाजी कल्याणकर** भविष्यात पाण्याची टंचाई होणार आहे आणि आपले पाणी विज बिल थकीत राहत आहे त्यामुळे टाक्या भरत नाही आणी त्यामुळे लोकांना वेळेवर पाणी मिळत नाही यासाठी हे पाणी दोन दिवसानंतर मीळत आहे यासाठी विदयुत बिल जर आपण वेळेवर भरणा केल्यास आपणास टंचाईच्या काळात आपणास त्रास होणार नाही.

**आयुक्त** आपण विज बिल भ्ररणा करण्याची काळजी घेत आहोत. मागील दिवसात विज कनेक्शन तोडले होते आपण त्यांना एक कोटीचा धनादेश देत होतो त्यावेळी त्यांनी म्हणाले की, रात्री सात वाजता आटीजीएसने रक्कम भरणा करावी, शासकीय कार्यालयात आटीजीएस केले जात नाही आणि नांदेड आमदार व मा. पालकमंत्री महोदयांनी फोन केला तेंव्हा त्यांनी विज जोडणी करुन दिली आहे. केवळ त्यांना स्टंड करावयाचा होता. म्हणून हे सर्व त्यांनी घडवून आणले होते. भविष्यात पाणी टंचाई लक्षात घेवून वीज पुरवठा खंडीत होणार नाही याकरीता विज बिल भरणा करण्यात येईल.

**किशोर स्वामी** मा. आयुक्त साहेब, आपण दोन दिवस आड पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेणार आहात. परंतू पाणी पुरवठा करीत असतांना वेळेवर पाणी लोकांना मिळाले पाहीजे असे आम्हाला वाटते. जी वेळ आपण ठरवून देणार त्या वेळेत पाणी मीळाले तर बरे होईल.

**दिपकसिंह रावत** सर्वाना विश्वासात घेवून पाणी दोन दिवस आड देण्याचा निर्णय घ्यावा. आपल्या पाणी लीप्ट करण्याच्या मोटारी आहेत या वांरवार नादुरुस्त होत असतात त्या दुरुस्त करण्यासाठी खुप खर्च येतो त्या ऐवजी आपण नवीन मोटारी खरेदी केली तर योग्य राहील.

**स. शेर अली** आता आपण पाणी टंचाई नाही असे सांगीतले व आपण आता असेही सांगीतले की दोन दिवस आड पाणी देण्याचा निर्णय आपण सर्व सभासदांचे मत घेवून निर्णय घेण्यात येईल असे आपण म्हणाले यासाठी आपले मी अभिनंदन करतो. परंतू माझ्या देगलूर नाका परीसरात आताच दोन दिवस आड पाणी देण्यात येत आहे. सकाळी पाणी देण्याची वेळ आहे तर ते दुपारी व सांयकाळी 5 वाजता देण्यात येते किंवा दुस-या दिवसी पाणी देण्यात येत आहे. आणि फोन वर चौकशी केली असता मोटार पम्प नादुरुस्त असल्याचे सांगण्यात येते. ज्या वेळेला पाणी दयावयाचे आहे तो वेळ निश्चीत करावी.

**सतिश देशमुख** तरोडा परीसरात आताच दोन दिवस आड पाणी मिळत आहे. आता एक दिवस वाढ करणार आहात ती एक दिवसाची वाढ करण्यात येवू नये.

**फारुख अली खाँ** नांदेड शहरात ज्या पाण्याच्या टाक्या आहेत त्या टाक्या मध्ये मोठया प्रमाणात गाळ साचलेला असेल कारण त्या टाक्याची सफाई आता पर्यत केलेली नाही त्यासाठी या टाक्यातील गाळ काढून टाकावा व टाक्याची सफाई करुन घ्यावी. शहरातील नागरीकांना स्वच्छ पाणी पुरवठा करावा.

**गुपीले बेबी** सिडको हडको भागात पाणी साचत आहे त्या पाण्याची दुंर्गधी येत आहे मि ही त्या ठीकाणी भेट दिली आहे. दुर्गंधी येत आहे ती तात्काळ थांबवावी. सीडको हडको भागात पाणी रात्री तीन वाजता येते त्यामुळे लोकांच्या झोप होत नाही यासाठी पाणी सोडण्याची वेळ बदलण्यात यावी.

**शमीम अब्दुला** नांदेड शहरात दररोज दोन वेळा पाणी सोडण्यात येंत होते आणि त्यानंतर दिवसातुन एक वेळ पाणी देण्यात येत होते. ते वेळेवर येत होते. आता दोन दिवस आड पाणी देण्यात येत आहे ते देखील वेळेवर सोडण्यात येत नाही, चौकशी केली तर एक ट्रीटमेट प्लांट बंद केला दुस-या ट्रीटमेंट प्लाटवरुन पाणी घेण्यात येत आहे असे सांगीतले जात आहे. देगलूर नाक्या या ठिकाणावरुन पाईप लाईन टाकली आहे तीला क्रास जोडणी केलेली नाही. कारण सांगण्यात येत आहे की चौकशी चालू आहे. हे कीती दिवस चालणार आहे लोकांना पाणी मिळत नाही ही समस्या आहे. चौकशी कुठ पर्यत आली याची माहीती आम्हाला देण्यात यावी. टंचाईच्या काळात पाणी देण्याची सोई होईल. क्रास जोडणी केल्यास जुन्या शहराच्या 4 टाक्याला पाणी येईल आमच्याकडील पाण्याची समस्या दुर होईल. याच साठी जिल्हाधीकारी यांनी पाईपचे काम करण्यासाठी आदेशीत केले होते त्यानुसार काम सुध्दा करण्यात आलेले आहे. जो रस्ता पाईप लाईन टाकण्यासाठी खोदण्यात आला त्याची दुरुस्ती सुध्दा केलेली नाही. एक कीलोमीटर पाण्याची लाईन टाकण्यात आली आहे. क्रास जोडणी करण्यात आलेली नाही, सध्या त्याठिकाणी पाणी नसेलेही पण जोडणीचे काम करुन घेतले पाहीजे.

**साबेर चाऊस** जुन्या शहरासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी पाईप लाईन टाकण्यात आली आहे. परंतू ती चालू केली नाही. ती तात्काळ चालु करुन घ्यावे. आपण त्या ठीकाणी स्थळ पहाणी करावी. मोंढयामध्ये जे दगड टाकले आहेत त्यावरही एक लेअर डांबराचा मारण्यात यावा. त्या ठिकाणी अपघात जास्त होत आहेत. यावर उपाय करावा.

**वैशाली देशमुख** जुन्या नळाची लाईन बदलून घ्यावी सर्वच लोकांनी नविन पाईपमधुन नळ घेतले आहेत. ज्या नागरीकांनी नवीन लाईन वरुन कनेक्शन घेतले त्यांना बरेच पाणी येते पण जुन्या नळाला पाणी कमी दाबाने येते त्यामुळे नागरीकांच्या तक्रारीत वाढ झाली आहे.

**अब्दुल सत्तार** आपल्याकडे अम्रत योजना चालू आहे या योजनेत 28 कोटी रुपये खर्च होणार आहेत त्या कंपनीने कीती किलोमीटर लाईन टाकली आहे. किती कीलोमीटर लाईन टाकावयाचे काम शिल्लक आहे त्याच्या कामाची गती काय आहे याची माहीती देण्यात यावी. अम्रत योजनेत आपला हीस्या 50 टक्के आपला आहे. शासनाने पैसे दिले तर काय आहे हे सागांवे. आठ महीने झाले वर्क आर्डर देवून किती काम केले आहे. याची माहिती आम्हाला देण्यात यावी.

**दिपकसिंह रावत** शहरात या योजने अंतर्गत प्रस्तावित ठिकाणी कामे नाहीत त्या जागी कामे करण्यात येत आहेत. आमच्या प्रभागात लाईन प्रस्तावित नाही आम्ही पत्र दिले आणि त्या कामाचा समावेश करण्यात येत नाही. ज्या ठिकाणी प्रस्तावित नाहीत त्या ठिकाणी कामे करण्यात येत आहे याचा खुलासा करण्यात यावा.

**सतिश देशमुख** या योजने अंतर्गत तरोडा भागातील नागरीकांचे पाण्याचे कनेक्शन तोडण्यात येत आहे ते नवीन लाईनला कनेक्शन करुन देणे कंत्राटदाराची जबाबदारी आहे परंतू कंत्राटदार जोडणी करुन देत नाही त्यामुळे नागरीकांना पाणी मीळत नाही त्यामुळे नागरीकांच्या तक्रारीत वाढ झालेली आहे. कंपनीने नळ जोडणी करावयाची आहे किंवा नाही की लोकांनी नविन नळ कनेक्शनची जोडणी साठी फी करावी लागणार याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** सभांव्य काळात पाणी टंचाईची बरेच प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत.

**दुष्यंत सोनाळे** आंबेडकर नगर, नई आबादी या भागात फार जुनी पाण्याची लाईन आहेत त्या लाईनला पाणी येत नाही. ड्रेनेज लाईनही विक झालेली आहे. पिवळी गिरणी एरीयात पाण्याची टाकी आहे त्या टाकी वरुन नई आबादी व आंबेडकर नगर भागास पाणी देण्यात येत नाही आमचे हे हक्काचे पाणी आहे. या टाकीचे पाणी इतरत्र वळवण्यात आलेले आहे. येत्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आहे. या भागातील काही लोकांना आताही पाणी मिळत नाही. या भागात अर्धा तास तरी पाणी मिळाले पाहीजे अशी आपणास विनंती आहे.

**राजेश यन्नम** श्रीनगर वार्ड व निजामकॉलनी भागात पाणी लोकांना मिळत नाही त्यासाठी या लोकांना पाणी मिळाले पाहीजे अशी विनंती आहे.

**सभागृह नेता** अमृत योजनेत कामे चालू असतांना ते काम करीत असतांना क्रास जोडणीचे काम करावे कारण त्या भागात लाईन टाकली आणि पाणी सोडता आले तर त्या लोकांना पाणीची सुविधा मिळेल. काम चालू आहे व जोडणी केली नाही तर लाईनचे काम करुन काहीही फायदा होणार नाही. शुल्क कारणासाठी काम थांबवण्यात येवू नये याकरीता संबधीत अभियंत्यास थोड फार रक्कम करण्याचे अधिकार देण्यात यावे.

**साबेर चाऊस** या योजनेत काम सध्या चालू आहे. एक कंत्राटदार पाईप टाकण्याचे काम करीत आहे तर दुसरा कंत्राटदार हा क्रास कनेक्शनचे काम करणार आहे असे सांगण्यात येत आहे. काम सबलेट केले आहे असे कळाले आहे. कामाचा दर्जा यामुळे टीकून राहील काय याचा खुलासा करावा.

**बालाजी कल्याणकर** शहरात चर्चा चालू आहे की डंपीग ग्रांउडवर झाडे लावण्याचे कामाची निविदा प्रसीध्द करण्यात आली आहे डंपीग ग्राऊंडवर ४ कोटीचे झाडे लावणार आहात काय. हा चर्चा विषय बनला आहे. या वर मला खुलासा पाहीजे. डंपीगवर झाडे लावल्यास त्या झाडे त्याठिकाणी येणार आहेत काय. आले तर ते टीकतील काय. जर याबाबत माझे समाधान न झाल्यास शासनाकडे या प्रकरणाची तक्रार करण्यात येईल.

**आयुक्त** पाणी टंचाई झाली तर क्रती आराखडा काय असावा. हा प्रश्न सर्वांच्या जिव्हाळयाचा आहे. सदस्यांना हा विषय फेस करावा लागणारा आहे. सर्व पदाधिकारी / सर्व सदस्य यांना विश्वासात घेवून हा आराखडा तयार करण्यात येईल. हातपम्प नां दुरुस्त आहेत ते तात्काळ दुरुस्त करण्यात येतील. मोटारीचा विषयी एक मोटार दुरुस्त करण्यात साधारणतः आपणास 25 लक्ष रुपये खर्च अदांजे अपेक्षीत होता त्यावर आपण नविन मोटार घेण्याचा निर्णय घेतला आहे. विदयुत पम्प स्टंड बाय ठेवण्यात येतील. टाक्याची सफाई करण्याचा कार्यक्रम अत्ती तातडीने हाती घेण्यात येईल. कोणताही ट्रीटमेन्ट प्लॉन्ट बंद नाही. क्रास कनेक्शन हे चौकशी साठी राहीलेले आहे. क्रास कनेक्शन आम्ही करु कारण त्या भागात पाणी येईलकिंवा आहे त्या भागातील पाणी त्या भागात जाईल याचा अभ्यास करण्यात येईल्. अम्रत योजने बाबतची येथे एक शंका उपस्थीत झालेली आहे त्यात तथ्य आहे. मुळ योजनेत काही भाग समावीष्ट नव्हता. जो भाग समावीष्ट नव्हता त्या भागाचा विचार करण्यात आलेला आहे. काही एरीयामध्ये लाईन होती त्या एरीयाचा समावेश झालेला आहे. हा डीपीआर एमजीपीने तयार केलेला आहे. मागच्या उन्हाळयात डीपीआर तयार झालेला होता. आपल्या अभियंत्याने ज्या भागात लाईन प्रस्तावीत आहेत त्या भागात जुन्या लाईन दाखवील्या आहेत त्या

मुळे टाकलेल्या लाईन या कंत्राटदाराने स्वखर्चाने काढून घ्याव्यात असे सांगण्यात आले आहे. जी बातमी आलेली आहे अम्रत योजनेच्या पाईप लाईनसी संबंधीत नाही. ज्या योजनेसंबधी आहे त्याना चौकशी करण्याचे आदेशीत केले आहे. पोलीसांनी त्यात एफआयआर केला आहे त्यात तस्थ आढळल्यास ते काम आजच रदद होईल. त्या कामाची सुरक्षा अनामत रक्कम जप्त केली जाईल.अम्रत योजनेत काही त्रुटी राहील्यास त्या सभाग्रहामध्ये ठेवण्यात येतील. मुळ डीपीआर मध्ये काही बदल झाला असल्यास 20 टक्याची मान्यता घेण्यात येईल. ही सुपर्ण माहीती आपल्या महासभेसमोर सादर करण्यात येईल. डॉ.आंबेडकर नगर भागात व नई आबादी भागात मागील दहा वर्षापासुन पाणी मीळत नाही. त्यावर तपासणी करुन घेण्यात येईल. पाणी चोरी होत असल्याची एक सुचना आहे यात पाणी चोरी करणा-यावर गुन्हे नोंद करण्यात येतील. आणि प्लबंरवर देखील कारवाई करण्यात येईल. टाकलेल्या क्रास कनेक्शन मुळे लोकांना पाणी मिळत असेल तर त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात येईल. पाईप लाईनचे काम सबलेट केले आहे असे वाटत नाही कारण दर आठवडयाच्या बैठकीस संबधीत कंत्राटदार हा उपस्थीत राहत आहे. तो 10 ते 12 किलोमीटर तो मागे आहे त्यासाठी त्याला नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. एकुण किती किलो मीटर लाईन टाकावयाची आहे त्यात बदल झाला असल्याने निश्चीत आकडेवारी पुढील सभेमध्ये सादर करण्यात येईल. काम करीत असतांना लोकांचे कनेक्शन तुटले आणी ते पुन्हा नव्याने कनेक्शन देण्यासाठी मनपाने काय ठरवले आहे याची माहीती घेवून पुढील सभेमध्ये सविस्तर माहीती देण्यात येईल.

**बालाजी कल्याणकर** — 4 कोटीचे झाडे लावणार आहोत त्याबाबतचा खुलासा करावा.

**फारुक बदवेल** — कच-याच्या संदर्भात एजन्सीने किती मजूर व ट्रॅक्टर लावलेले आहेत याची माहीती देण्यात यावी. तसेच ड्रेनेजच्या गाडीचीही समस्या आहे गाडीवर ड्रायव्हर नाहीत त्यामुळे चेंबर साफसफाई करणे होत नही त्या व्यवस्थसा करावी.

**सभागृह नेता** — प्रधानमंत्री आवाज योजनेच्या सर्व्हेचे काम चालू आहे हा सर्वे करीत असताना गठयातील चार पाच फॉर्म काढुन आणत आहेत व सर्वे करीत आहेत असे करणे थांबले पाहीजे ही योजना दरवर्षी आपणास 3 हजार घरे मीळणार आहेत यात प्राधान्य कोणास दयावे हे निश्चीत होणे गरजेचे आहे आपले धोरण असे होते की पहीला टप्पा विधवा, घटस्फोटीत अपंग अशा लोकांना प्रथम याला देण्यात यावे यावर कोणाचेही नियंत्रण नाही सल्लागाराने गठयातुन फॉम काढावे व सर्वे करावा असे चालू आहे आपल्याला कोणता डीपीआर पाठवयाचा आहे हे माहीत नाही अशा सुचना सल्लागार आपण सांगीतल्या त्या सुचनाचे पालन करणे आवश्यक आहे आपण कोणता डीपीआर पाठवणार आहोत .

**स. शेर अली** — यापुर्वी 5 हजारा घराचा डीपीआर पाठवण्यात आला होता शासनाने या प्रस्तावात त्रुटी काढल्या होत्या आता पाठवण्यात येणारा डीपीआर हा मागील लोकांचा की नवीन लोकांचा याचा खुलासा करावा

**दिपकसिंग रावत** — आपण ऑन लाईन फॉर्म घेणे बंद केले आहेत पण भारत सरकारच्या वेबसाइटवर लोक फॉम अपलोड करीत आहेत आपल्याकडे 55 हजार फॉर्म आले यात बरेच लोक वंचीत राहीलेले आहेत. त्यांना फॉर्म भरण्याची व्यवस्था करावी. एससी, एसटी व्हीडोज असा क्रायटेरीया ठरवीण्यात यावा. झोन वाईज आपणास फॉर्म साईटवर शार्ट आऊट करावे लागतील या योजनेपासुन कोणीही वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

**बालाजी कल्याणकर** — कच-याच्या डीपीआरचा विषय महत्वाचा नाही काय याबाबत खुलासा करावा हा विषय हमाझ्या प्रभागाचा नसुन नांदेड शहराचा विषय आहे.

**अब्दुल सत्तार** — सभागृहात विषय पत्रिकेवर विषय प्रधान मंत्री योजनेचा आला होता. तो पास झाला होता त्याला कन्फरमेशन दीले नव्हते मग कामाचे आदेश देवून कामही करत आहेत. ही कंपनी बोगस आहे. अपील कंपनीमध्ये जे मुल काम करीत होते तीच मुल काम करीत आहेत कंपनीनी माणसे कोठुन आणले याची चौकशी करावी तसेच कोण सर्वे करीत आहे याचीही चौकशी करावी ही कंपनी बोगस आहे याचे काम थांबवाव. 5 वर्षे हे केवळ सर्वेत जाणार आहेत अमंलबजावणी काही होणार नाही या कंपनीचे काम थांबवावे.

**आंनद चव्हाण** — हे काम थांबवावे व या कामची चौकशी करावी

**गोंधळ चालू झाला.**

**सभागृह नेता** — सदरचा विषय हा पेन्डींग ठेवण्यात यावा.

**बालाजी कल्याणकर** कच-याच्या डीपीआरचा विषय महत्वाचा नाही काय.

राजदंड सभेतुन सदस्य श्री बालाजी कल्याणकर यांनी घेवून गेले.

**विषय क्रं.01**

दिनांक 19.12.2017 रोजी मागील झालेल्या मनपा सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत

**महापौर** दिनांक 19.12.2017 रोजी मागील झालेल्या मनपा सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.92** **ठराव**

दिनांक 19.12.2017 रोजी मागील झालेल्या मनपा सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास हि मनपा सर्वसाधारणा सभा सर्वानुमते मान्यता देते.

**विषय क्रं.02**

मा. निर्वाचन अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, निवडणूक शाखा, नांदेड यांचे पत्र क्रं. 2017/साशा-3/निवडणूक/DPDC/BYE/CR दिनांक 19.12.2017 अन्वये नांदेड जिल्हा नियोजन समिती निवडणूक-2017 च्या मोठे नागरी निर्वाचन क्षेत्राकरिता रिक्त असलेल्या 07 जागांवर खालील उमेदवार सर्व प्रवर्गामधील सर्व सात जागांकरीता बिनविरोध निवडून आले त्याची नोंद घेणे बाबत.

| अ.क्र. | मतदारसंघाचे नांव | प्रवर्ग | आरक्षणाची संख्या | निवडून आलेल्या उमेदवारांचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | मोठे नागरी निर्वाचन क्षेत्र | अनुसुचीत जाती | 01 | गजभारे बापूराव नागोराव |
| | | ना.मा.प्र. | 01 | हुसेन शोएब मजहर |
| | | ना.मा.प्र.(महिला) | 01 | स्वामी शैलजा किशोर |
| | | सर्वसाधारण | 02 | काळे राजु गोविंदराव |
| | | | | फारुख हुसेन कासीम पिरान |
| | | सर्वसाधारण (महिला) | 02 | खालसा प्रकाशकौर सुरजितसिंघ |
| | | | | भवरे शिलाबाई किशोर |

**महापौर** नोंद घेण्यात येते.

**ठराव क्रं.93** **ठराव**

मा. निर्वाचन अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, निवडणूक शाखा, नांदेड यांचे पत्र क्रं. 2017/साशा-3/निवडणूक/DPDC/BYE/CR दिनांक 19.12.2017 अन्वये नांदेड जिल्हा नियोजन समिती निवडणूक-2017 च्या मोठे नागरी निर्वाचन क्षेत्राकरिता रिक्त असलेल्या 07 जागांवर खालील उमेदवार सर्व प्रवर्गामधील सर्व सात जागांकरीता बिनविरोध निवडून आले असुन त्याची नोंद हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते घेते.

| अ.क्र. | मतदारसंघाचे नांव | प्रवर्ग | आरक्षणाची संख्या | निवडून आलेल्या उमेदवारांचे नांव |
|---|---|---|---|---|
| 1 | मोठे नागरी निर्वाचन क्षेत्र | अनुसुचीत जाती | 01 | गजभारे बापूराव नागोराव |
| | | ना.मा.प्र. | 01 | हुसेन शोएब मजहर |
| | | ना.मा.प्र.(महिला) | 01 | स्वामी शैलजा किशोर |
| | | सर्वसाधारण | 02 | काळे राजु गोविंदराव |
| | | | | फारुख हुसेन कासीम पिरान |
| | | सर्वसाधारण (महिला) | 02 | खालसा प्रकाशकौर सुरजितसिंघ |
| | | | | भवरे शिलाबाई किशोर |

**विषय क्रं. 03**

मा. आयुक्त कुटूंब कल्याण तथा संचालक राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान मुंबई यांचे पत्र क्रं. NRHM/Urban RCH/21458-21505/2011, दिनांक 24.08.2011 नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मध्ये महाराष्ट्र शासनाने आरसीएच फेस-2 कार्यक्रमा अंतर्गत आदेश क्रमांक NRHM/Urban RCH/CPM Appt/8168-89/10 दिनांक 17.10.2010 अन्वये कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतन रुपये 18,000/- (अक्षरी रुपये अठरा हजार फक्त) वर सिटी प्रोग्राम मॅनेजर या पदावर **श्री सुहास रघुनाथराव सोनुले** यांची नियुक्ती केली आहे संबंधीतांचे वेतन दिनांक 31.03.2012 पर्यंत शासनाकडून अदाई करण्यात येत होते. त्यानंतर संबंधीतांचे वेतन मनपाकेच्या निधीतुन करावयाचे आहे.

मनपा सर्वसाधारण सभेने दिनांक 15.03.2012 रोजी समंत केलेला ठराव क्रं. 182 व्दारे मनपाकेच्या स्वता:च्या निधसीतुन रुपये 18,000/- प्रतिमहा एकत्रीत वेतन देण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे त्यानुसार संबंधीतांना मनपा निधीतुन वेतन अदाई करण्यात येत आहे.

यापुर्वी नावाशमनपा सर्वसाधारण सभेसमोर कार्यालयीन प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/4123/17 दिनांक 23.06.2017 अन्वये प्रस्ताव पाठविण्यात आला होता. सभेची मान्यता अपेक्षीत धरुन कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/8010/17 दिनांक 06.09.2017 अन्वये दिनांक 01.07.2017 ते 30.12.2017 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तदनंतर नावाशमनपा सर्वसाधारण सभेने मंजुर केलेला ठराव क्रं. 84 दि. 19.12.2017 नुसार कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/आवि/जंद/463/18 दिनांक 09.01.2018 अन्वये संबंधीतांचे प्रतिमहा एकत्रीत मानधन रुपये 30,000/- करण्यात आले.

महाराष्ट्र शासन आणि मनपा यांच्या संयुक्त उपक्रमांतुन संपूर्ण राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यासाठी मनपाकेस प्रोग्राम मॅनेजर या पदाची आवश्यक्ता असून तसेच संबंधीतांचे काम समाधानकारक असल्याचा संबंधीत विभागाने सादर केलेला आहे संबंधीतांच्या सेवेची मुदत दिनांक 30.12.2017 रोजी संपलेली असुन त्यांच्या सेवेत दिनांक 31.12.217 रोजीचा तांत्रीक खंड देवुन दिनांक 01.01.2018 ते 29.06.2018 पर्यंत मुदतवाढ देणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस्तव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**महापौर** प्रशासनाने सादर केलेला प्रस्तावा मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.94** **ठराव**

मा. आयुक्त कुटूंब कल्याण तथा संचालक राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान मुंबई यांचे पत्र क्रं. NRHM/Urban RCH/21458-21505/2011, दिनांक 24.08.2011 नुसार नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मध्ये महाराष्ट्र शासनाने आरसीएच फेस-2 कार्यक्रमा अंतर्गत आदेश क्रमांक NRHM/Urban RCH/CPM Appt/8168-89/10 दिनांक 17.10.2010 अन्वये कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतन रुपये 18,000/- (अक्षरी रुपये अठरा हजार फक्त) वर सिटी प्रोग्राम मॅनेजर या पदावर **श्री सुहास रघुनाथराव सोनुले** यांची नियुक्ती केली आहे संबंधीतांचे वेतन दिनांक 31.03.2012 पर्यंत शासनाकडून अदाई करण्यात येत होते. त्यानंतर संबंधीतांचे वेतन मनपाकेच्या निधीतुन करावयाचे आहे.

मनपा सर्वसाधारण सभेने दिनांक 15.03.2012 रोजी समंत केलेला ठराव क्रं. 182 व्दारे मनपाकेच्या स्वता:च्या निधसीतुन रुपये 18,000/- प्रतिमहा एकत्रीत वेतन देण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे त्यानुसार संबंधीतांना मनपा निधीतुन वेतन अदाई करण्यात येत आहे.

यापुर्वी नावाशमनपा सर्वसाधारण सभेसमोर कार्यालयीन प्रस्ताव क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-6/4123/17 दिनांक 23.06.2017 अन्वये प्रस्ताव पाठविण्यात आला होता. सभेची मान्यता अपेक्षीत धरुन कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा /साप्रवि/आस्था-6/8010/17 दिनांक 06.09.2017 अन्वये दिनांक 01.07.2017 ते 30.12.2017 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तदनंतर नावाशमनपा सर्वसाधारण सभेने मंजुर केलेला ठराव क्रं. 84 दि. 19.12.2017 नुसार कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/आवि/जंद/463/18 दिनांक 09.01.2018 अन्वये संबंधीतांचे प्रतिमहा एकत्रीत मानधन रुपये 30,000/- करण्यात आले.

महाराष्ट्र शासन आणि मनपा यांच्या संयुक्त उपक्रमांतुन संपूर्ण राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यासाठी मनपाकेस प्रोग्राम मॅनेजर या पदाची आवश्यक्ता असून तसेच संबंधीतांचे काम समाधानकारक असल्याचा संबंधीत विभागाने सादर केलेला आहे संबंधीतांच्या सेवेची मुदत दिनांक 30.12.2017 रोजी संपलेली असुन त्यांच्या सेवेत दिनांक 31.12.217 रोजीचा तांत्रीक खंड देवुन दिनांक 01.01.2018 ते 29.06.2018 पर्यंत मुदतवाढ देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्र.04**

मनपा हद्यीत नांदेड शहराच्या मंजूर विकास योजनेनुसार मौ. असदुल्लाबाद सर्व्हे नं. 34 सि.स.नं. 9975 मधील आरक्षण क्रं. बी-36, बी-37, बी-38 ही जागा Play Ground, बी-37 – High School & Play Ground, बी-38 – Primary School & Play Ground ने बाधीत होते.

सदर जागेत ब-याच प्रमाणात अनाधिकृत विकास झालेला आहे. तसेच गुंठेवारी अंतर्गत कांही भुखंड नियतिम केले आहेत. कांही भुखंडास बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. तर कांही भुखंडास बांधकाम परवानगी नाकारण्यात आली आहे.

आजघडीला सदर जागेत मोठयाप्रमाणात अनाधिकृत विकास झाला असल्याने जागा संपादित करुन आरक्षण विकसित करणे मनपाकेस शक्य नाही. सबब महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार सदर आरक्षण वगळणेच्या निर्णयास्तव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**दिपकसिंह रावत** प्रशासनाचा विषय असो की, नगरसेवकाचा विषय असो त्याची प्रत सर्वांना दिली आहे त्यामुळे प्रथमच असे झाले असल्याने मी मा. महापौर व आयुक्त यांचे अभिनंदन करतो. मुळ प्रस्ताव काय आहे. हे आम्हाला कळाले आहे. आयुक्ताचे पुन्हा अभीनंदन एमआरटीपी अक्ट 1966 चे कलम 37 अंतर्गत आपण प्रस्ताव टाकला आहे सर्वे न 36 मध्ये 6 आरक्षणे आहेत हे कुठे तरी आम्हाला कमी दाखवले आहे हे कुठेतरी आमची दीशाभुल करण्यासारखे आहे. यामध्ये नगरसेवकाला पत्र देतांना

त्यांत नमुद केले की यात 6 आरक्षणे आहेत गुंठेवारी करीत असंतांना काही भुखंड नियमीत केले आहे. गुंठेवारीचे नीयम सांगतो की घराचे बांधकाम नीयमीत करता येति अधीका-यावर आपण कारवाई करणार आहात काय या ठीकाणी आरक्षण आहे तेव्हा एडीटीपने कळाले नाही का की त्या ठीकाणी आरक्षण आहे शहरात एकुण 230 आरक्षणे आहेत पैकी 56 आरक्षण वगळण्यासाठी पाठविण्यात आले आहे. परंतू शासनाकडून 56 पैकी 36 आरक्षणे वगळण्यात आले आहेत असे शासनाचे पत्र आले आहे. आपल्याला आरक्षण वगळण्यात येते काय. भुखंडमाफीयाला कुठेतरी मोकळे सोडत आहात 2016 च्या परीपत्रकानुसार त्या ठीकाणीच्या आरआर नुसार 5 टक्के रक्कम त्यांनी भरावी पैकी 2.5 टक्केमनपाला व 2.5 टक्के नगररचना खात्यात जमा करावी. आम्ही आता हा प्रस्ताव पास करु व वगळल्यानंतर हा प्रस्ताव जीबीच्या समोर आणावा.

**जयश्री पावडे** — 36 बी हे जागा शाळा व ग्राउंडसाठी आरक्षीत आहे या यागेवर अतीक्रमण होत असतांना आपले झोनल काय करीत होते. आरक्षीत जागेवरील आरक्षण उठवू नये शाळेसाठी आरक्षीती आहे ते आपली शाळा सुरु करावी. आरक्षीत जागेवर अतीक्रमण होत आहेत त्यावर आळा बसवावा.

**आनंद चव्हाण** — 36 बी 37 व 38 या ठीकाणी आरक्षण आहे 36 बी मध्ये 8 हजार स्वेअरमीटरचे आरक्षण आहे. 37 मध्ये 15700 स्वेअरमीटरचे आरक्षण आहे. आणी 38 मध्ये 8 स्वेअरमीटरचे आरक्षण आहे गुंठेवारी व बांधकाम परवानगी आरक्षीत जागेवर सहाय्यक संचालक नगररचना यांनी कशी काय दिली. आपल्या भुखंडावर कोणी अतीक्रमण करेल आणी आपण त्याला परवाणग्यादेणार काय आपण आल्यापासुन परवाणग्या मीळत आहेत. कालच्या बजेटमध्ये 71 करोड रुपये टीपी विभागाचे उत्पन्न धरले आहे त्याला आपण सक्षम करणार आहात काय. यात कीती भुखंड 36 37 मध्ये परवानगी दिलेलेले आहे याची माहीती देण्यात यावी.

**अब्दुल हाफीज** — आरक्षण उठवण्याची आपणास काय गरज आहे हे कळत नाही.

**सभागृह नेता** — नांदेड शहरात इतरही आरक्षणाचे ठीकाण आहेत त्या ठीकाणी वस्ती झाली आहे या ठीकाणीचे आरक्षण उठवण्याचा प्रस्ताव आला असुन इतर ठीकाणावराचा प्रस्ताव का घेण्यात आला नाही इतरही जीबीसमोर आणावे.तो पर्यत प्रस्ताव हा स्थगीत ठेवण्यात यावा.

**महेंद्र पींपळे** — आरक्षणाचा वीषय रदद करावा. शाळेसाठीह जागा आरक्षीत आहे. भुमाफीया त्या ठीकाणी जावून जागा गीळक्रत करतील. शाळेचे / खेळाचे मैदान याकरीता आरक्षीत ठेवावे.

**आयुक्त** — 36 बी, 37 व 38 मध्ये अनुक्रमे शाळा, खेळाचे मैदान व प्राथमीक शाळा व ग्राउंड या साठी आरक्षीत आहे. या तीन्ही आरक्षाणचे क्षेत्र 32000 स्वेअरमीटर आहे. या आरक्षणाचा एल सेफ आकार आहे. या पुर्वी 5 बांधकाम परवाणगी आपण दिलेली आहे. हा प्रस्तावीत आरक्षणाच्या जागेवर 8 परवानगी मनपाने 2016 ला रदद केल्या आहेत. हा प्रस्ताव 13 नोव्हेबर ला पाठवीला आहे त्यावेळी आपल्याकडे निवडणुकीची धामधुम होती बांधकाम रेग्यूलर करता येईल, आपण यापुर्वी हा ठराव केला नाही हे लक्षात आले ही फाईल तपासणी अंती आढळूनआले आहे. 5 परवानगी या सभेत आल्या नसत्या. आरक्षण वगळयासाठी जीबीची मान्यतेची आवश्यकता असते. माझ्या काळात 2 ते 3 केस रदद करण्यात आल्या आहेत. सर्वसाधारण सभेने आरक्षण वगळणे गरजेचे आहे हा प्रस्ताव रीजेक्ट केला तरी चालेल.

**अब्दुल सत्तार** — सर्व शहराचे आरक्षण कीती आहेत, कीती ठीकाणी बांधकामाना परवानगी दिल आहे याची माहीती पुढच्या सभेत देण्यात यावी व हा प्रस्ताव रदद करावा.

**महापौर** — सदरील आरक्षण हटवीण्याचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात येते इतर ही आरक्षणाची माहीती सादर करावी.

**साबेर चाऊस** — मॉलच्या जमीनीवर आरक्षण आहे आता त्या ठीकाणी काम चालू आहे त्या ठीकाणचे आरक्षण आपण उठवील आहे काय याची माहीती देण्यात यावी.

**आनंद चव्हाण** — प्रशासनाने सादर आरक्षणाच्या प्रस्तावा मध्ये आरक्षणाला बाधा न येता फक्त बी-37 मधील या आरक्षणातील 2015 पुर्वीचे बांधकामास नियमानुसार कंपाऊंडींग अंतर्गत शासनाची मान्यता घेऊन नियमीत करण्यास मान्यता देण्यात यावी.

**महापौर** — श्री आनंद चव्हाण यांनी सुचविल्यानुसार प्रशासनाने सर्वे नंबर 34 मधील आरक्षणाला बाधा न येता फक्त बी-37 मधील या आरक्षणातील 2015 पुर्वीचे बांधकामास नियमानुसार कंपाऊंडींग अंतर्गत शासनाची मान्यता घेऊन नियमीत करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.95** **ठराव**

मनपा हद्दीत नांदेड शहराच्या मंजूर विकास योजनेनुसार मौ. असदुल्लाबाद सर्व्हे नं. 34 सि.स.नं. 9975 मधील आरक्षण क्रं. बी-36, बी-37, बी-38 ही जागा Play Ground, बी-37 – High School & Play Ground, बी-38 – Primary School & Play Ground ने बाधीत होते.

सदर जागेत ब-याच प्रमाणात अनाधिकृत विकास झालेला आहे. तसेच गुंठेवारी अंतर्गत कांही भुखंड नियतिम केले आहेत. कांही भुखंडास बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. तर कांही भुखंडास बांधकाम परवानगी नाकारण्यात आली आहे.

आजघडीला सदर जागेत मोठयाप्रमाणात अनाधिकृत विकास झाला असल्याने जागा संपादित करुन आरक्षण विकसित करणे मनपाकेस शक्य नाही. सबब महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 37 नुसार सदर आरक्षण वगळण्या बाबतचा प्रशासनाने प्रस्ताव महासभेपुढे सादर केलेला आहे. म्हणुन उक्त आरक्षणाला बाधा न येता फक्त बी-37 मधील या आरक्षणातील 2015 पुर्वीचे बांधकाम नियमानुसार कंपाऊंडींग अंतर्गत शासनाची मान्यता घेऊन नियमीत करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.05**

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान अंतर्गत प्रकल्प NAD-014 (पॅकेज-2, 3अ, 3ब) किमंत रुपये 21497.33 लक्ष किमंतीस केंद्र शासनाने दिनांक 25 ऑक्टोंबर 2016 रोजी मान्यता प्रदान केलेली असुन सदरील पॅकेज अंतर्गत रस्ता क्रमांक 06 – **दरबार मस्जीद ते किल्ला या रस्त्याचा समावेश करण्यात आलेला होता**. मंजुर आराखडयानुसार सदरील रस्त्याची लांबी 265 मी. व रुंदी 18 मी. असुन त्याअंतर्गत बाधीत मालमत्तेचे भुसंपादन करणे आवश्यक होते. त्यानुसार महानगरपालिकेकडुन भुसंपादनाचा प्रस्ताव व त्याअंतर्गतची कार्यवाही मनपा ठराव क्रं. 191 दिनांक 23.02.2007 अन्वये प्रस्तावित करण्यात आली. भुसंपादनाचा प्रस्ताव दिनांक 12.01.2007 रोजी सादर करण्यात आला व भुसंपादन प्रस्ताव अंतर्गत सदरील रस्त्यामध्ये एकूण 34 मालमत्ता बाधीत होत होत्या.

परंतु भुसंपादनाची प्रक्रिया कार्यवाही अंतर्गत कांही बाधीत मालमत्ता धारकांनी वारंवार आक्षेप नोंदवुन व न्यायालयात याचीका दाखल केल्यामुळे सदरील रस्त्याचे काम न्यायालयाच्या निर्देशानुसार 08 बाधीत मालमत्ता ताबा घेण्यास प्रतिबंद केल्यामुळे हाती घेता येऊ शकले नाही. सदरील रस्त्यातील कांही मालमत्ताधारकांनी समंती दिल्यामुळे सदरील कामाचे मनपा सर्व साधारण सभा ठराव क्रं. 88 दिनांक 28.06.2013 अन्वये प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान केल्यानुसार निविदा प्रक्रिया करुन सदरील कामाचे कार्यारंभ आदेश मे. एस.कुमार कन्स. ठाणे यांना आदेश क्रं. नावाशमनपा/जेएनएनयुआरएम-रस्ते/31622/14 दिनांक 04.03.2014 अन्वये देण्यात आले. परंतु दरम्यानच्या काळात 08 बाधीत मालमत्ताधारकांनी पुनश्चः न्यायालयाच्या निर्देशानंतर मावेजा स्वीकारण्यास नकार देवुन न्यायालयात याचीका दाखल केली त्यामुळे दरम्यानच्या कालावधीत रस्त्याचे काम हाती घेता येवु शकले नाही. मा. उच्च न्यायालयाने दिनांक 19.01.2016 रोजी प्रकरण निकाली काढल्यानंतर मंडळ अधिकारी नांदेड व मनपा पथक यांचेकडुन ताबा घेण्यासाठी वारंवार प्रयत्न करण्यात आल्यानंतरही कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने ताबा घेण्याची कार्यवाही करता येवु शकली नाही. ताब्यासाठी सतत पाठपुरावा केल्यानंतर तहसीलदार नांदेड यांचेकडुन दिनांक 30.10.2017 रोी मनपा पथकाकडुन पोलीस बंदोबस्त दिनांक 16.11.2017 रोजी संपादीत जागेवरील बांधकाम काढण्याची कार्यवाही करण्यात येवुन काम हाती घेण्यात आले.

परंतु संपादीत जागेची लांबी **दरबाज मस्जीद ते किल्ला पर्यंत** 265 मी. इतकी असुन सदरील रस्ता गणपती विसर्जन व इतर उत्व अंतर्गत कायदा व सुव्यवस्था, विसर्जनस्थळ नावघाट पर्यंत तसेच जुना नांदेड शहरातील वाहतुक नावघाट मार्गे पुढे दक्षिण नांदेडला जोडुन सुरळीत होण्याच्या दृष्टीने रस्त्यांची अस्तित्वातील किल्ला पर्यंतची लांबी पुढे Ch. 445 म्हणजे 180 मी. ने वाढविणे आवश्यक आहे त्यामुळे कार्यारंभ आदेश दिलेल्या कंत्राटदाराकडून समंती दिल्यानुसार निविदेतील अंर्तभुत दरावर निविदेतील कलम 38(1) (2) नुसार मुळ अंदाजपत्रकातील अंर्तभुत बाबीतील परिमाणात वाढ होणार असुन त्यानुसार काम हाती घेवुन यापुर्वीच्या रुपये 2,20,63,437/- ला प्रशासकिय व आर्थीक मान्यतेत (अंदाजपत्रकीय किमंतीत) देखील वाढ होणार आहे. वाढीव लांबीतील रस्त्याच्या बाबीतील परिमाणामुळे निविदा व अटीशर्तीनुसार रु. 1,93,76,716/- इतक्या रक्कमेने वाढ होणार आहे.

सदरील प्रकल्पातील सर्व रस्त्यांची कामे पुर्ण झालेली असुन केंद्र शासनाकडे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याच्या दृष्टीने सदरील रस्त्याचे काम हाती घेवुन पुर्ण करणे आवश्यक असल्यामुळे रस्त्यांच्या लांबीतील आवश्यक वाढ विचारता घेता प्राप्त असणा-या प्रशासकिय व आर्थीक मान्यतेतील सुधारील वाढ रुपये 1,93,76,716/- इतक्या रक्कमेसह होणा-या रुपये 4,14,40,153/- (अक्षरी रुपये चार कोटी चौदा लक्ष चाळीस हजार एकशे त्रेपन्न फक्त) रक्कमेस सुधारीत प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करण्याच्या मान्यतेस्तव सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर.

**आयुक्त** सदरील प्रस्ताव सभाग्रहामध्ये हा प्रस्ताव सादर केला आहे कारण सन 2011 ला या कामाचा डीपीआर तयार केला आहे. आता 2018 आहे. काम करीत असतांना 8 फुटाची रीटनींग वॉलचे बांधकाम करणे आवश्यक आहे असे लक्षात आले नाही. परंत प्रत्यक्ष साईटवर हे काम करणे अत्यंत गरजेचे आहे. मुळ कामात हे काम समावीष्ठ नव्हते. आणी हे काम करणे आवश्यक असल्याने मुळ

रक्कमेत वाढ होणार होती म्हणुन हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या समोर ठेवला आहे. हा प्रस्ताव पास करावा अशी विनंती सभागृहास आहे.

**सभागृह नेता** सीव्हर / पाण्याची लाईन टाकुन घ्यावी.

**साहेब चाऊस** पास करावा व नावघाटच्या रस्त्याचा यात समावेश करावा

**महापौर** प्रशासनाने सादर केलेला प्रस्तावास प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.96** **ठराव**

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान अंतर्गत प्रकल्प NAD-014 (पॅकेज-2, 3अ, 3ब) किमंत रुपये 21497.33 लक्ष किमंतीस केंद्र शासनाने दिनांक 25 ऑक्टोंबर 2016 रोजी मान्यता प्रदान केलेली असुन सदरील पॅकेज अंतर्गत रस्ता क्रमांक 06 – **दरबार मस्जीद ते किल्ला या रस्त्याचा समावेश करण्यात आलेला होता**. मंजुर आराखडयानुसार सदरील रस्त्याची लांबी 265 मी. व रुंदी 18 मी. असुन त्याअंतर्गत बाधीत मालमत्तेचे भुसंपादन करणे आवश्यक होते. त्यानुसार महानगरपालिकेकडुन भुसंपादनाचा प्रस्ताव व त्याअंतर्गतची कार्यवाही मनपा ठराव क्रं. 191 दिनांक 23.02.2007 अन्वये प्रस्तावित करण्यात आली. भुसंपादनाचा प्रस्ताव दिनांक 12.01.2007 रोजी सादर करण्यात आला व भुसंपादन प्रस्ताव अंतर्गत सदरील रस्त्यामध्ये एकूण 34 मालमत्ता बाधीत होत होत्या.

परंतु भुसंपादनाची प्रक्रिया कार्यवाही अंतर्गत कांही बाधीत मालमत्ता धारकांनी वारंवार आक्षेप नोंदवुन व न्यायालयात याचीका दाखल केल्यामुळे सदरील रस्त्याचे काम न्यायालयाच्या निर्देशानुसार 08 बाधीत मालमत्ता ताबा घेण्यास प्रतिबंद केल्यामुळे हाती घेता येऊ शकले नाही. सदरील रस्त्यातील कांही मालमत्ताधारकांनी समंती दिल्यामुळे सदरील कामाचे मनपा सर्व साधारण सभा ठराव क्रं. 88 दिनांक 28.06.2013 अन्वये प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान केल्यानुसार निविदा प्रक्रिया करुन सदरील कामाचे कार्यारंभ आदेश मे. एस.कुमार कन्स. ठाणे यांना आदेश क्रं. नावाशमनपा/जेएनएनयुआरएम-रस्ते/31622/14 दिनांक 04.03.2014 अन्वये देण्यात आले. परंतु दरम्यानच्या काळात 08 बाधीत मालमत्ताधारकांनी पुनश्चः न्यायालयाच्या निर्देशानंतर मावेजा स्वीकारण्यास नकार देवुन न्यायालयात याचीका दाखल केली त्यामुळे दरम्यानच्या कालावधीत रस्त्याचे काम हाती घेता येवु शकले नाही. मा. उच्च न्यायालयाने दिनांक 19.01.2016 रोजी प्रकरण निकाली काढल्यानंतर मंडळ अधिकारी नांदेड व मनपा पथक यांचेकडुन ताबा घेण्यासाठी वारंवार प्रयत्न करण्यात आल्यानंतरही कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने ताबा घेण्याची कार्यवाही करता येवु शकली नाही. ताब्यासाठी सतत पाठपुरावा केल्यानंतर तहसीलदार नांदेड यांचेकडुन दिनांक 30.10.2017 रोजी मनपा पथकाकडुन पोलीस बंदोबस्त दिनांक 16.11.2017 रोजी संपादीत जागेवरील बांधकाम काढण्याची कार्यवाही करण्यात येवुन काम हाती घेण्यात आले.

परंतु संपादीत जागेची लांबी **दरबाज मस्जीद ते किल्ला पर्यंत** 265 मी. इतकी असुन सदरील रस्ता गणपती विसर्जन व इतर उत्व अंतर्गत कायदा व सुव्यवस्था, विसर्जनस्थळ नावघाट पर्यंत तसेच जुना नांदेड शहरातील वाहतुक नावघाट मार्गे पुढे दक्षिण नांदेडला जोडुन सुरळीत होण्याच्या दृष्टीने रस्त्यांची अस्तित्वातील किल्ला पर्यंतची लांबी पुढे Ch. 445 म्हणजे 180 मी. ने वाढविणे आवश्यक आहे त्यामुळे कार्यारंभ आदेश दिलेल्या कंत्राटदाराकडून समंती दिल्यानुसार निविदेतील अंर्तभुत दरावर निविदेतील कलम 38(1) (2) नुसार मुळ अंदाजपत्रकातील अंर्तभुत बाबीतील परिमाणात वाढ होणार असुन त्यानुसार काम हाती घेवुन यापुर्वीच्या रुपये 2,20,63,437/- ला प्रशासकिय व आर्थीक मान्यतेत (अंदाजपत्रकीय किमंतीत) देखील वाढ होणार आहे. वाढीव लांबीतील रस्त्याच्या बाबीतील परिमाणामुळे निविदा व अटीशर्तीनुसार रु. 1,93,76,716/- इतक्या रक्कमेने वाढ होणार आहे.

सदरील प्रकल्पातील सर्व रस्त्यांची कामे पुर्ण झालेली असुन केंद्र शासनाकडे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याच्या दृष्टीने सदरील रस्त्याचे काम हाती घेवुन पुर्ण करणे आवश्यक असल्यामुळे रस्त्यांच्या लांबीतील आवश्यक वाढ विचारता घेता प्राप्त असणा-या प्रशासकिय व आर्थीक मान्यतेतील सुधारील वाढ रुपये 1,93,76,716/- इतक्या रक्कमेसह होणा-या रुपये 4,14,40,153/- (अक्षरी रुपये चार कोटी चौदा लक्ष चाळीस हजार एकशे त्रेपन्न फक्त) रक्कमेस सुधारीत प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.06** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मार्फत हबीबीया कॉलनी येथे मनपाकेची प्राथमिक शाळा चालविण्यात येते सदरील शाळेत इयत्ता ०१ ते ०८ वर्गा पर्यंत विद्यार्थांना शिक्षण देण्यात येते.सदरील शाळेत विद्यार्थ्यांची संख्या किती व शिक्षकांची संख्या कमी पडत असल्यास ती तात्काळ नियमानुसार भरण्यात यावी ह्या करीता सर्वसाधारण सभेत मान्यता घेण्यात यावी.

**सुचक** :- अरशीया कौसर मोहम्मद हबीब **अनुमोदक** :- शमीम बेगम शेख जावीद

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडच्या वतीने 15 शाळा चालविण्यात येत असुन मनपा प्राथमिक शाळा महेबुबीया कॉलनी येथे इयत्ता पहिली ते आठवी वर्गातील विद्यार्थी संख्या 220 आहे. सदर शाळेवर तीन कायमस्वरुपी शिक्षक व दोन कंत्राटी शिक्षक असे एकूण पाच सह शिक्षक कार्यरत आहेत. तसेच मनपा शिक्षण आस्थापनेवर सालसन 2016-17 च्या संच मान्यतेनुसार 89 पदांची मान्यता आहे. परंतु सद्यस्थितीत केवळ 52 सह शिक्षक कार्यरत असुन 37 पदे ही रिक्त आहेत.

त्यानुसार सदरील रिक्त जागेवर पात्र उमेदवार उपलब्ध करुन देण्याबाबत वारंवार मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांना वारंवार पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. परंतु अद्याप पावेतो संबंधीत कार्यालयाकडून पात्र उमेदवार उपलब्ध झालेले नाहीत आणि मनपा शिक्षण आस्थापनेवर विविध जिल्हा परिषदा व मनपा येथील कार्यरत शिक्षकांचे आंतरजिल्हा बदलीने एकतर्फी पदस्थापना मिळण्याबाबत प्रस्ताव दाखल होत आहेत. सदर सह शिक्षकांना बिंदुनामावलीनुसार रिक्त जागेवर पदस्थापना देण्याबाबत कार्यवाहि प्रस्तावित आहे. तसेच शालय शिक्षण व क्रिडा विभागाचा शासन निर्णय क्रं. पीआरई-2006/(4767)/ प्राशि-1 दिनांक 16 डिसेंबर 2009 अन्वये सालसनस 2009-10 या वर्षापासुन पुढे प्राथमिक शिक्षण सेवक भरती प्रक्रिया केंद्रीय भरतीपुर्व निवड परीक्षेव्दारे करण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे त्यानुसार सदर शिक्षणसेवकांची पदे भरण्याचा अधिकार मनपाकेस नाही.

**अरशीया कौसर** मला महापौर साहेब बोलण्याची अनुमती देण्यात यावी. सर्वात प्रथम मी सर्वाचे आभार मानते. एक शेर म्हणण्यात आला. मा. अशोकराव शंकररावजी चव्हाण माजी मुख्यमंत्री यांचे आभार त्यांनी मला या सभाग्रहात काम करण्याची संधी उपलब्ध करुन दिली.

नांदेड नगरी ही श्री गुरु गोविंदसिंगजी यांचे या नांदेड नगरीत वास्तव्यात होते याचा आम्हाला आभीमान आहे.नांदेड शहर हे असे आहे की, गोदावरी नदीच्या काटावर वसलेले शहर आहे. मी प्रभाग क्रमांक 12 ची नगरसेविका आहे. माझ्या प्रभागात जी शाळा आहे ती 8 वी पर्यत आहे. या शाळेत 5 शिक्षक आहेत. तर विदयार्थी जास्त आहेत. खोलीची संख्या कमी असल्याने एका खोलीत दोन वेगवेगळे वर्ग भविण्यात येतात. आणि एकच शिक्षक त्या खोलीत शिकविण्याचे काम करतो. त्यामुळे त्याचे व्यवस्थापन योग्य पध्दतीने होत नाही. अशिच शाळा सुरु राहील्यास मुलाचे भविष्य धोक्यात येईल. बेटी बचाव बेटी पढाव अशी घोषना अस्तित्वात असली तरीही या शाळेतील विदयार्थ्याचे भविष्य अंधारमय आहे. शिक्षकाची आवश्यकता या शाळेसाठी आहे. या शाळेचे जवळ एक फग्शंन हॉल आहे. त्या ठीकाणी ही शाळा स्थलांतरीत करावी.

**अर्पणा नेरलकर** विषय पत्रिका सुरु होण्यापुर्वी आम्हाला बोलू दिले नाही आणि आता विषय पत्रिका सुरु झाली आहे तरही बोलू दिले जात नाही. विषय पत्रिका केव्हा सुरु झाली हे कळाले नाही.

**अब्दुल सत्तार** प्रभाग क्रमांक 12 मधील शाळेत शिक्षक किती आहेत. आपण म्हणता की, शाळेत शीक्षक घेता येत नाही मुलाची संख्या जास्त आहे. शक्षिक कमी आहेत. यामुळे शिक्षकाची भरती करावी.

**आयुक्त** या विषय पत्रीकेत एक विषय आहे. तो मंजूर झाला तर शिक्षकांची मागणी करता यईल आपणास जागा भरता येणार नाहीत.

**अब्दुल सतार** 8 वी पर्यत मान्यता आहे. शिक्षक नाही तर आपण ही शाळा बंद करावी. विदयार्थ्याचे नुकसान होवू नये यासाठी शिक्षकाची भरती करावी. आपल्या शाळेत गरीब लोकांचे मुले शिकत आहेत मोठे लोकांचे मुले इतर शाळेतुन शिक्षण घेत आहे.

**सभागृह नेता** प्रस्ताव समोर आहे तर आपण काही करा शिक्षक घ्यावे शिक्षक नसल्याने मुलाचे नुकसान होत आहेत.

**तुप्पेवार संगिता** मनपाच्या 17 शाळा आहेत प्रत्येक शाळेत शिक्षकांची संख्या खुप कमी आहे. त्याकरिता शिक्षकाची भरतीची प्रक्रीया पुर्ण करावी.

**अर्पणा नेरलकर** शिक्षकांची संख्या कमी आहेच. जगमवाडीच्या शाळेचे छत खराब झाले आहे त्या शाळेचे काम त्वरीत करावे. स्लॅप काढून त्यावर केवळ पत्रे टाकावी.

**अ. रशीद** 8 वी पर्यत शाळा असल्याने पुढील शिक्षण घेण्यासाठी मुलांना खुप त्रास होत आहे. त्याकरीता पुढच्या वर्ग चालू करावे ते 10 पर्यत चालू करणे आवश्यक आहे.

**गुपीले बेबी** देगलूर नाक्याच्या शेजारी जी शाळा आहे त्या शाळेच्या बाजूला मोकळे मैदान आहे. त्या शाळेला आवार भींतीचे काम करुन दिल्यास मुलाना खेळनेसाठी मैदान होईल.

**जयश्री पावडे** जी मनपाची शाळेतीलमुले आहे त्याचा प्रगत अहवाल सर्वसाधारण सभे मध्ये सादर करावा. मुलाचे नुकसारन होत आहे ते थाबालयाला पाहीजे. आजचा विदयार्थ्या हा उदयाचा भारताचा नागरीक आहे. मुलांचे खच्चीकरण होणार नाही याची काळजी आपण घेतली पाहीजे. आपल्याकडे जागा आहे आणी आपल्या उत्पन्नात वाढ होईल यासाठी आपण शाळा चालवावी. मनपा शाळेच्या शिक्षणाचा दर्जा सुध्दा सुधारण्यास मदत होईल. पुणे / कोल्हापुरच्या मनपाच्या शाळा अतीशय चांगल्या आहेत. त्या शाळा पाहुन काही बदल करता येतील काय . यात आयुक्त महोदयांनी पुढाकार घ्यावा.

**शैलेजा स्वामी** कोल्हापुरच्या ज्या शाळा आहेत त्या शाळा अत्यंत चांगल्या आहेत. आयुक्ताकडून मला जास्त अपेक्षा आहे. त्या शाळेला पारीतोषीक मिळाले आहे. आयुक्त सर कोल्हापुरचे आहेत.त्यांचा नाव लौकीक चांगला आहे. नांदेडच्या शाळा या कोल्हापुरच्या धर्तीवर कश्या आणता येईल यासाठी प्रयत्न करावे.

**फारुक बदवेल** — मोंढयाकडून मन्यार गल्ली देगलूर नाका या ठीकाणी फुटपाथ पुर्ण अतीक्रमण झालेले आहे. लोक गाडे लावत आहेत ते गाडे आपले मनपाचे अतीक्रमण पथक पाठवून हा रस्ता खुला करावा.

**महापौर** — स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.97** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिके मार्फत हबीबीया कॉलनी येथे मनपाकेची प्राथमिक शाळा चालविण्यात येते सदरील शाळेत इयत्ता ०१ ते ०८ वर्गा पर्यंत विद्यार्थांना शिक्षण देण्यात येते. सदरील शाळेत विद्यार्थ्यांची संख्या किती व शिक्षकांची संख्या कमी पडत असल्यास ती तात्काळ नियमानुसार भरण्याय हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.07** **प्रस्ताव**

अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्या बाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाने दिनांक 21.09.2017 रोजी काढलेल्या शासन निर्णयात अनुकंपा नियुक्ती योजने संदर्भात तरतुदी हया केवळ शासकिय कर्मचा-यांपुरत्याच सीमीत आहेत. सदर तरतुदी हया जिल्हा परिषद / नगरपालिका / महानगरपालिका / महामंडळे / प्राधिकरणे / व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापनेवरील कर्मचा-यांना थेट लागु होणार नाहीत त्यासाठी संबंधीत प्रशासकिय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील असे नमुद आहे. यानुसार अनुकंपा नियुक्तीवर प्रलंबित असलेल्या सर्व प्रकरणात नियमानुसार पडताळणी करुन रिक्त असलेल्या पदावर तात्काळ नियुक्ती देण्याबाबत आयुक्तांनी योग्यतो निर्णय त्वरीत घेण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- आनंद चव्हाण, मो. साबेर चाऊस **अनुमोदक** :- शबाना बेगम मो. नासेर

**आनंद चव्हाण** — लाड समीतीच्या कर्मचारी आहेत त्यांना तात्काळ कामावर घेण्यात यावे.

**आयुक्त** — महापौर महोदया, आपण दोन पध्दतीने नीयुक्ती करीत असतो. एक तर लाड समीती दुसरी अनुकंपा तत्तावावर वारसा हक्काने भरीती करीत असतो. या पाच वर्षात दोनही भरत्या थांबलेल्या होत्या. लाड समीतीच्या शीफारसी नुसार आपण 20- 22 लोकांना रतील केलेलीआहे. अनुकंपा तत्वावर भरती करण्यासाठी आपण कागदपत्राची छाननी सुरु आहे. ही भरती देखील लवकरच पुर्ण करणार आहोत.

**स. शेर अली** — एससी/एसटी व इतरांचा स्पष्ट उल्लेख केला नाही.

**आयुक्त** — दोन वेगवेगळे शासन निर्णय आहेत.लाड समीती व अनुकंपा धर्तीवर नियुक्त बाबत शासन निर्णय आहे केवळ एससी समाजाच्या लोकांना घ्यावे असा निर्णय आहे. एसटी/ओबीसी/ओपन यांची भरती होणार नाही.

**महापौर** — स. सदस्यांचा प्रस्ताव म्रजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.98** **ठराव**

अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्या बाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाने दिनांक 21.09.2017 रोजी काढलेल्या शासन निर्णयात अनुकंपा नियुक्ती योजने संदर्भात तरतुदी हया केवळ शासकिय कर्मचा-यांपुरत्याच सीमीत आहेत. सदर तरतुदी हया जिल्हा परिषद / नगरपालिका / महानगरपालिका / महामंडळे / प्राधिकरणे / व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापनेवरील कर्मचा-यांना थेट लागु होणार नाहीत त्यासाठी संबंधीत प्रशासकिय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील असे नमुद आहे. यानुसार अनुकंपा नियुक्तीवर प्रलंबित असलेल्या सर्व प्रकरणात नियमानुसार पडताळणी करुन रिक्त असलेल्या पदावर तात्काळ नियुक्ती देण्याबाबत आयुक्तांनी योग्यतो निर्णय त्वरीत घेण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.08** **प्रस्ताव**

नावाशमनपा हद्यीतील प्रभाग क्रं. 12 उमर कॉलोनी हा भाग 100% अल्पसंख्यांक बहुल प्रभाग असुन या प्रभागाची लोकसंख्या जवळपास 28,000 एवढी असून सदर प्रभाग हा अविकसीत असून या प्रभागातील उमर कालोनी, एकबाल नगर, हीलालनगर इत्यादी भागात कसल्याही प्रकारची मुलभुत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे येथील नागरीकांना अत्यंत त्रास सोसावा लागत आहे. करिता सदर भागात मुलभुत सुविधा (रस्ते / नाली) ची कामे करण्यासाठी अल्पसंख्यांक भागाचा विकास करण्यासाठी शासनाकडून अल्पसंख्यांक निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- अब्दुल सत्तार अ. गफुर **अनुमोदक** :- अ. रशीद अ. गणी

**फारुख बदवेल** — अल्पसंख्यांकाची वस्ती आहे या सर्व अल्पसंख्याक वस्तीचा विचार करावा.

**उप महापौर** अगोदरच सुचना करण्यात आली आहे की ज्या भागात अल्प संख्याकाची वस्ती आहे त्या भागातील नगरसेवकाने त्यांचे प्रभागात काय काय कामे आहेत त्याची यादी तयार करुन मा. महापौर यांचे कडे दयावी.

**बापुराव गजभारे** महात्मा जोतीबा फुले यांची जयंती 11 एप्रील रोजी आहे . सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांचा पुतळा उभारण्यासाठी तातडीने उपाय योजना करावी हाविषय महापौर यांनी पहील्याच बैठकीतनिकाली काढणे गरजेचे होते. 11 एप्रील पर्यत पुतळा बसावा अशी विनंती आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री यांनी बैठक घेवून काही सुचना केल्या होत्या. त्यात त्यानी महात्मा फुले यांचा पुतळा बसविण्यात यावा.विमानतळाच्या वाकींग ट्रॅकचा विषय होता. विमान तळ ते गुरुव्दारा पर्यत झाडे लावणे शासनाकडून तो निधी येतो 28 कोटीचा निधी नाला कामासाठी आले हे कंत्राटदार आम्हास सांगतो. महानगरपालिकेला निधी शासनाकडून मीळतो तो नगरसचिवामार्फत आम्हाला कळवावा. बरेच दिवसापासुन इंजीनीअर एका ठीकाणीच आहेत त्याची पदस्थापना करावी. कै. गणपतराव मोरगे, एक सामाजीक जाण असलेले व्यक्तीमत्व होत. समाजकार्य त्यांचा खुप चांगल होत. व नांदेडचे कंत्राटदार होते मनपाचेही त्यांनी बरेच काम केले आहे. म्हणुन त्यांच्या घराकडे जाणा-या रस्त्याला त्यांचे नांव देण्याचा प्रस्ताव मी या ठिकाणी ठेवतो.

**सभागृह नेता** महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा पुतळा बसावा यासाठी आपण सर्वजन प्रयत्न करीत आहोत. पुतळा तयार आहे. कोर्ट मॅटर चालू होते हाय कोर्टाचा निकाल लागला आहे. 1400 स्वेअर मीटर जागा निकाली काढली आहे. तो प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचे कडे प्रस्ताव पाठवावे. सर्वानी या प्रस्तावाचा पाठ पुरावा करावा.

**आयुक्त** जिल्हाधिकारी यांचे कडे प्रस्ताव पाठविला आहे. जागेचा प्रश्न आहे तो वाटा घाटीने सोडविण्यात येईल.

**अब्दुल सत्तार** महापालिकेचा वर्धापन दिन 26 मार्चला असुन आपण विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे. एक समीती तयार करण्यात यावी. हींदी, उर्दु मुशायराचे आयोजन करावे. या सभेत यास मान्यता देण्यात यावी.

**तेहरा अमीतसिंह** प्रभाग क्रं. 17 गुरुव्दारा परिसर हा अल्पसंख्याक भागात मोडत असल्याने सदरील भागासाठीही शासना मार्फत अल्पसंख्यांक निधी प्राप्त करुन विकासाचे कामे करण्यात यावी.

**अ. फहीम** प्रभाग क्रं. 18 हा खडकपुरा, पक्की चाळ हा अल्पसंख्यांक भागात मोडत असल्याने सदरील भागासाठीही शासना मार्फत अल्पसंख्यांक निधी प्राप्त करुन विकासाचे कामे करण्यात यावी.

**साबेर चाऊस** प्रभाग क्रं. 13 हा खडकपुरा, पक्की चाळ हा अल्पसंख्यांक भागात मोडत असल्याने सदरील भागासाठीही शासना मार्फत अल्पसंख्यांक निधी प्राप्त करुन विकासाचे कामे करण्यात यावी.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.99** **ठराव**

नावाशमनपा हद्दीतील प्रभाग क्रं. 12 उमर कॉलोनी हा भाग 100% अल्पसंख्यांक बहुल प्रभाग असुन या प्रभागाची लोकसंख्या जवळपास 28,000 एवढी असून सदर प्रभाग हा अविकसीत असून या प्रभागातील उमर कालोनी, एकबाल नगर, हीलालनगर इत्यादी भागात कसल्याही प्रकारची मुलभुत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे येथील नागरीकांना अत्यंत त्रास सोसावा लागत आहे. करिता सदर भागात मुलभुत सुविधा (रस्ते / नाली) ची कामे करण्यासाठी अल्पसंख्यांक भागाचा विकास करण्यासाठी शासनाकडून अल्पसंख्यांक निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी शासनाकडे शिफारस करण्यास मान्यता देण्यात येते.

## <u>पुरवणी विषय पत्रिका</u>

**विषय क्रं.01**

**विषय - महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत मुळ मंजुर निविदा रक्कमेपेक्षा जादा होणा-या खर्चास सुधारीत प्रशासकीय व आर्थीक मंजुरी मिळणेबाबत.**

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत नांवाशमनपा कडुन सादर केलेल्या रस्ते विकास या प्रकल्पास प्रकल्प किंमत रु. 88.23 कोटीस शासन निर्णय नगरो-2010/प्र.क्र. 242/नवि-33 दि. 23 फेब्रु 2011 अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

सदरील मंजुर प्रकल्पातील सादर केलेलया प्रस्तावानुसार पॅकेज क्र. 1 ची मंजुर किंमत रु. 29.42 कोटी, पॅकेज 2अ व 2ब ची मंजुर किंमत रु. 36.31 कोटी व पॅकेज क्र. 3 ची मंजुर किंमत रु. 22.50 कोटी इतकी असुन त्यानुसार कामाच्या निविदा काढण्यात आल्या व स्थायी समितीने ठराव क्र. 104 दि. 02.08.2011 अन्वये पॅकेज 1 च्या रु. 30.19 कोटी, पॅकेज 2अ च्या रु.

16.97 कोटी, पॅकेज 2बच्या रु. 21.75 कोटी व पॅकेज 3 च्या रु. 24.79 कोटीच्या निविदा स्वीकृतीस मान्यता प्रदान केलेली असुन त्यानुसार निविदा मंजुर आदेश क्र. नांवाशमनपा/नगरोत्थान/482/011 दि. 24.08.2011 अन्वये कामाच्या निविदा उल्लेखीत दरानुसार मंजुर करण्यात येवुन मंजुर दरानुसार होणा-या अतिरिक्त खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्रदान केलेली आहे. निविदा दर स्वीकृती ठरावानुसार सदरील कामाचे कार्यारंभ आदेश पॅकेज 1 करीता मे. शारदा कंन्स., पॅकेज 2अ करीता मे. शंकर कंन्स, पॅकेज 2ब करीता आर जे बिल्डकॉन व पॅकेज क्र. 3 करीता कल्याणटोल इन्फ्रा. यांना देण्यात आले.

शासन निर्णयानुसार मंजुर वित्तीय आकृतीबंधानुसार राज्यशासन 70% नुसार रु. 61.76 कोटी रक्कमेच्या व मनपा हिस्सा 30% नुसार 26.47 कोटी इतका असुन राज्य शासनाकडुन 61.76 कोटीचे अनुदान प्राप्त असुन आजपर्यंत उपरोक्त पॅकेजमधील रस्त्यांच्या कामावर राज्य व मनपा हिस्स्यासह आजपर्यंत रु. 76.95 कोटी खर्च झालेले आहेत.

1. पॅकेज 1 मधील एकुण 6 रस्त्यांपैकी 1 रस्ता हद्दीबाहेरील असल्याने वगळला असुन उर्वरीत 5 रस्त्यांची कामे कंत्राटदाराकडुन पुर्ण करण्यात आलेली आहे. पॅकेज 1 वर आजअखेर रु.25.72 कोटी खर्च झालेला आहे. 2. पॅकेज क्र. 2अ मध्ये एकुण 6 रस्ते असुन त्यापैकी 3 रस्ते पुर्ण करण्यात येवुन 1 रस्त्याचे काम सां.बा.वि. कडुन इतर योजनेतुन पुर्ण करण्यात आलेले आहे. सदर रस्त्याचे नाली व साईडपट्टीचे काम शिल्लक आहे व त्यासाठी 60लक्ष अंदाजीत खर्च अपेक्षीत आहे. तसेच उर्वरीत 2 रस्त्यापैकी नंदीग्राम सोसायटी ते मालटेकडी रेल्वे स्टेशन या रस्त्याचे 300 मी नालीचे व आनंदनगर ते सुंदरनगर ते रस्ता क्र. 44 पर्यंतच्या रस्त्याचे एकाबाजुन 300 मी लांबीतील काम शिल्लक असुन उपरोक्त शिल्लक कामाकरीता अंदाजे रु. 45.82 लक्ष खर्च अपेक्षित आहे. याशिवाय मा. आयुक्त, उपायुक्त, कार्यकारी अभियंता व स. सदस्य यांचे सुचनेनुसार झुणका भाकर केंद्र ते इनकम टॅक्स कॉलनी या रस्त्यावरील वाहतुक वर्दळ विचारात घेता सुरळीत वाहतुकीच्या दृष्टीने पर्यायी रस्ता म्हणुन सदरील रस्त्यास समांतर असणारा 750 मी. लांबीतील रस्त्याचे डांबरीकरण हाती घेणे आवश्यक आहे. सदरील वाढीव काम संबंधीत कंत्राटादाराकडुन मंजुर दरावर निविदा कलम 38 अंतर्गत अंतर्भुत बाबीच्या परिमाणात वाढ देय करुन हाती घेण्याची व त्यावरील होणा-या रु. 45.56 लक्षाच्या खर्चास मान्यता मिळावी.

3. पॅकेज 2ब मध्ये एकुण 10 रस्ते अंर्तभुत असुन त्यापैकी 5 रस्त्यांचे काम पुर्ण करण्यात आलेले असुन उर्वरीत रस्त्यापैकी (अ) गाडेगाव भाग -1 या रस्त्याचे 200 मी लांबीतील नाली व रस्ता डांबरीकरण व पुर्ण लांबीतील बीसी लेयर चे काम बाकी होते, (ब) बरकत कॉम्पलेक्स ते सावरीकर दवाखाना या रस्याचे एका बाजुचे बीसी लेयरचे काम शिल्लक आहे. (क) एसबीएचबँक ते एनटीसी मील या रस्त्याचे 300 मी लांबीतील नाली व 300 मी लांबीतील एका बाजुच्या साईड पट्टीचे काम शिल्लक आहे. (ड) भोजालाल गवळी ते किल्ला या रस्त्याचे काम साबांविभागाकडुन इतर योजनेतुन हाती घेऊन सी.सी. पुर्ण केले होते परंतु पृष्ठभाग खराब झाल्यामुळे यावर बीसी करणे जरुर आहे. व सदरील कामाकरीता 10 लक्षाचा खर्च अपेक्षीत आहे. (ई) मुजाम प्रेस ते जुना गंज या संपुर्ण रस्त्याचे काम ड्रेनेज लाईन काम हाती न घेतल्यामुळे अपुर्ण असल्याने पुर्ण करणे बाबत आढावा बैठकीत सुचित करण्यात आलेले आहे.

सदरील पॅकेज 2ब मधील 1. गाडेगाव भाग-1 व मिल्लतनगर रस्त्याच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी मा. आयुक्त, उपायुक्त, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, क. अभियंता व स. सदस्य यांचे समवेत करण्यात आली. त्यावेळी केलेल्या सुचनेनुसार गाडेगाव भाग 1 अंतर्गत रस्त्याचे यापुर्वी बीएम लेयरपर्यंत काम करण्यात आलेले होते परंतु सदरील रस्त्याच्या कामानंतर पापुवजनि विभागाकडुन water supply Line व मलनिःसारण लाईन टाकण्याचे काम हाती घेतल्यामुळे पुर्ण रुंदीतील रस्ता नादुरुस्त व वाहतुकीच्या दृष्टीने योग्य नसल्यामुळे पुर्ण रुंदीत रस्त्याचे Restoration करणे आवश्यक आहे. तसेच 785 मी. लांबीतील रस्त्याच्या Rcc pipe सह नालीचे काम हाती घेण्यात आलेले होते. परंतु सदरील मुख्य रस्त्याच्या नालीच्या कामानंतर लगतच्या रस्त्याच्या नालीचे काही प्रमाणात काम झालेले आहेत. परंतु मुख्य रस्त्यावरील नालीची Invert Level वर असल्यामुळे लगतच्या रस्त्याच्या नालीतुन पाणीनिचरा (**B.C. Soil settlement** मुळे) योग्य पध्दतीने होत नसल्यामुळे लगतच्या परिसरात मोठया प्रमाणावर (**water Logging**) पाणी पावसाळयात साचते. पाण्याचा निचरा योग्य पध्दतीने होण्याकरीता रस्त्याच्या यापुर्वीच्या केलेल्या **Rcc pipe** नालीचे कामाऐवजी योग्य Invert **Level** घेवुन पुनश्च **Rcc** नालीचे काम हाती घेणे आवश्यक आहे. सदरील रस्त्याचे **Restoration व Rcc** नालीचे वाढीव काम संबंधीत कंत्राटदाराकडुन पुर्वीच्या मंजुर दरावर निविदा कलम 38 अंतर्गत अंर्तभुत बाबीच्या परिमाणात वाढ देय करुन हाती घेण्याची व त्यावरील होणा-या वाढीव खर्च रु. 24065183/- व मुळ निविदेतील शिल्लक कामावर होणारा खर्च रु. 3662712/- इतक्या रक्कमेस मान्यता मिळावी. याशिवाय 2ब पॅकेज मधील मिल्लतनगर रस्त्याचे काम यापुर्वी हाती घेण्यात आले होते. परंतु ड्रेनेज लाईनच्या कामामुळे तसेच अतिवृष्टीमुळे खराब झालेला पृष्ठभाग इ. कारणांमुळे सदरील रस्त्याचे काही प्रमाणात Restoration व बीसी लेयर चे काम हाती घेणे आवश्यक आहे. तसेच नालीचे Laying करणे आवश्यक आहे. याशिवाय या रस्त्यावरील एका बाजुच्या 300 मी लांबीतील नालीचे शिल्लक काम करणे आवश्यक आहे. सदरील रस्त्याचे काही प्रमाणात Restoration व BC Layer चे काम व Rcc pipe नाली **Laying इ.**वाढीव काम संबंधीत कंत्राटदाराकडुन मंजुर दरावर निविदा कलम 38 अंतर्गत अंर्तभुत बाबीच्या परिमाणात वाढ देय करुन हाती घेण्याची व त्यावरील होणा-या वाढीव खर्च रु. 8658168/- इतक्या रक्कमेस मान्यता व्हावी.

पॅकेज 2ब मधील उर्वरीत रस्त्याकरीता मुळ निविदेतील शिल्लक रस्त्याची कामे हाती घेण्याकरीता एकुण रु.13019308/- व वाढीव कामाकरीता एकुण रु. 36333129/-इतका खर्च अपेक्षित आहे, त्यास मान्यता मिळावी.

तरोडा पॅकेज 3 मध्ये एकुण 13 रस्त्यांची काम असुन त्यापैकी आजमितीस 2 रस्त्यांची कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत. व 2 कामे बीएसयुपी योजनेअंतर्गत हाती घेवुन पुर्ण करण्यात आल्यामुळे वगळण्यात आलेली आहेत. सदरील पॅकेज मधील 11 रस्त्याच्या शिल्लक कामाकरीता एकुण खर्च रु. 9,72,54,493/- अपेक्षीत आहे. याशिवाय सदरील पॅकेज मधील 11 रस्त्यापैकी रस्ता क्र. बीके -1, बीके-2, बीके-3, बीके-4, बीके-6, बीके-11, बीके-12 या रस्त्याची कामे यापुर्वी काही प्रमाणात बीएम लेवल पर्यंत डांबरीकरण करण्यात आलेली होती. परंतु तरोडा भागातील मंजुर पापु व मलनिःसारण योजने अंतर्गत सदरील रस्त्यावर ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम हाती घेण्यात आल्यामुळे सदरील रस्त्यांचे Restoration करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरील रस्त्याच्या Restoration अंतर्गत अंतर्भुत बाबीच्या परिमाणात वाढ अपेक्षीत आहे. सदरील वाढीव काम संबंधीत कंत्राटदाराकडुन मंजुर दरावर निविदा कलम 38 अंतर्गत अंतर्भुत बाबीच्या परिमाणात वाढ देय करुन हाती घेण्याची व त्यावरील होणा-या रु. 26454493/- खर्चास मान्यता मिळावी.

एकंदरीत मंजुर प्रकल्पांतर्गत खालील तक्त्याचे अवलोकन व्हावे.

मंजुर प्रकल्पानुसार सद्यःस्थितीचे आर्थिक चित्रण

| पॅकेजचे नाव क्रमाक | मंजुर प्रकल्प किंमत(कोटीत) | स्वीकृत निविदा किंमत (कोटीत) | आजपर्यंत झालेला खर्च (कोटीत) | निविदेतील शिल्लक कामाकरीता लागणारा अपेक्षित खर्च (कोटीत) | मुळ निविदेशिवाय वाढीव कामाकरीता लागणारा खर्च(कोटीत) | सुधारीत संभाव्य एकुण खर्च (कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|
| **पॅकेज 1 तरोडा** | 29.42 | 30.19 | 25.72 | - | - | 25.72 |
| **पॅकेज 2अ** | 36.31 | 16.97 | 13.23 | 1.15 | 0.46 | 14.84 |
| **पॅकेज 2ब** | | 21.75 | 18.895 | 1.30 | 3.63 | 23.82 |
| **पॅकेज 3** | 22.50 | 24.79 | 17.085 | 9.72 | 2.64 | 29.45 |
| **विद्युतपोल शिफटींग** | -- | -- | 2.02 | 0.08 | -- | 2.10 |
| **एकुण** | 88.23 | 93.70 | 76.95 | 12.25 | 6.74 | 95.93 |
| **प्रकल्प सल्लागार फीस** | | | | | | 4.53 |
| **एकुण** | **88.23** | **93.70** | **76.95** | **12.25** | **6.74** | **100.46** |

उपरोक्त तक्त्यानुसार शासननिर्णयानुसार मंजुर प्रकल्प किंमत रु. 88.23 कोटी इतकी आहे. स्थायी समितीने ठराव क्र. 104 दि. 02.08.2011 अन्वये उपरोक्त मंजुर प्रकल्पातील पॅकेज 1, 2अ, 2ब व 3 च्या एकुण रु. 93.70 कोटीच्या निविदा स्वीकृती किंमतीस मान्यता प्रदान केलेली असुन त्यानुसार निविदा मंजुरी आदेश क्र. नांवाशमनपा/नगरोत्थान/482/011 दि. 24.08.2011 अन्वये कामाच्या निविदा उल्लेखीत दरानुसार मंजुर करण्यात येवुन मंजुर दरानुसार होणा-या अतिरिक्त खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्रदान केलेली आहे. आजपर्यंत कामावरील मंजुर अतिरिक्त बाबी विद्युतीकरणसह झालेला खर्च रु. 76.95 कोटी मुळ निविदेतील शिल्लक कामावरील अपेक्षीत खर्च रु. 12.25 कोटी व वाढीव कामाकरीता लागणारा अपेक्षीत खर्च रु. 6.74 कोटी असा एकुण रु. 95.93 कोटी व याशिवाय प्रकल्प सल्लागाराची फीसवर झालेला खर्च रु. 4.53 कोटी इतका होत असुन असा एकुण रु. 100.46 कोटी होत आहे. जे की पुर्वीच्या प्रशासकीय मान्यता प्राप्त रक्कमेपेक्षा 10 टक्के जास्त असल्या कारणाने सुधारीत प्रशासकीय व आर्थिक मान्यतेचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**आयुक्त** — नगरोत्थान , बीएसयुपीही कामे संपवणे गरजेचे आहे. यासाठी मनपाने कर्ज स्वरुपातनिधी उभा केला आहे. या ठीकाणी जो जास्तीचा खर्च होणार आहे त्या खर्चास मान्यता देण्यात येईल नगरोत्थानचा सुटसुटीत विषय या सभेसमोर सादर केला आहे. ही योजना कीतीची आहे कामे कीतीची झाली व कीतीची कामे शिल्लक आहेत ही माहीती दीलेली आहे. 50 कोटीचे कर्ज घेत आपण मागचे कर्ज घेतले त्याची परतफेड केली आहे. घेतलेल्या कर्जाचा असाच एक प्रस्ताव सभेत आणावा. कर्ज ज्या कारणासाठी घेतले आहे त्यावरच हे कर्जाची रक्कम खर्च झाली पाहीजे अशी आमची विनंती आहे.

**अ. हफीज** — नगरोत्थानचे जे रस्ते घेतलेले आहेत ते काही ठीकाणी 30 फुट काही ठीकाणी 20 केले आहेत ज्या ठीकाणी रस्त्याची रुंदी जास्त आहे ती रुंदी वाढवून काम करावे. शफी कुरेशी यांचे घरापासुन हा रस्ता करण्यात यावा.

**महापौर** — प्रशासनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

ठराव क्रं.100 ठराव

**विषय - महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत मुळ मंजुर निविदा रक्कमेपेक्षा जादा होणा-या खर्चास सुधारीत प्रशासकीय व आर्थीक मंजुरी मिळणेबाबत.**

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत नांवाशमनपा कडुन सादर केलेल्या रस्ते विकास या प्रकल्पास प्रकल्प किंमत रु. 88.23 कोटीस शासन निर्णय नगरो-2010/प्र.क्र. 242/नवि-33 दि. 23 फेब्रु 2011 अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

सदरील मंजुर प्रकल्पातील सादर केलेलया प्रस्तावानुसार पॅकेज क्र. 1 ची मंजुर किंमत रु. 29.42 कोटी, पॅकेज 2अ व 2ब ची मंजुर किंमत रु. 36.31 कोटी व पॅकेज क्र. 3 ची मंजुर किंमत रु. 22.50 कोटी इतकी असुन त्यानुसार कामाच्या निविदा काढण्यात आल्या व स्थायी समितीने ठराव क्र. 104 दि. 02.08.2011 अन्वये पॅकेज 1 च्या रु. 30.19 कोटी, पॅकेज 2अ च्या रु. 16.97 कोटी, पॅकेज 2बच्या रु. 21.75 कोटी व पॅकेज 3 च्या रु. 24.79 कोटीच्या निविदा स्वीकृतीस मान्यता प्रदान केलेली असुन त्यानुसार निविदा मंजुर आदेश क्र. नांवाशमनपा/नगरोत्थान/482/011 दि. 24.08.2011 अन्वये कामाच्या निविदा उल्लेखीत दरानुसार मंजुर करण्यात येवुन मंजुर दरानुसार होणा-या अतिरिक्त खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्रदान केलेली आहे. निविदा दर स्वीकृती ठरावानुसार सदरील कामाचे कार्यारंभ आदेश पॅकेज 1 करीता मे. शारदा कंन्स., पॅकेज 2अ करीता मे. शंकर कंन्स, पॅकेज 2ब करीता आर जे बिल्डकॉन व पॅकेज क्र. 3 करीता कल्याणटोल इन्फ्रा. यांना देण्यात आले.

शासन निर्णयानुसार मंजुर वित्तीय आकृतीबंधानुसार राज्यशासन 70% नुसार रु. 61.76 कोटी रक्कमेच्या व मनपा हिस्सा 30% नुसार 26.47 कोटी इतका असुन राज्य शासनाकडुन 61.76 कोटीचे अनुदान प्राप्त असुन आजपर्यंत उपरोक्त पॅकेजमधील रस्त्यांच्या कामावर राज्य व मनपा हिस्स्यासह आजपर्यंत रु. 76.95 कोटी खर्च झालेले आहेत.

1. पॅकेज 1 मधील एकुण 6 रस्त्यांपैकी 1 रस्ता हद्दीबाहेरील असल्याने वगळला असुन उर्वरीत 5 रस्त्यांची कामे कंत्राटदाराकडुन पुर्ण करण्यात आलेली आहे. पॅकेज 1 वर आजअखेर रु.25.72 कोटी खर्च झालेला आहे. 2. पॅकेज क्र. 2अ मध्ये एकुण 6 रस्ते असुन त्यापैकी 3 रस्ते पुर्ण करण्यात येवुन 1 रस्त्याचे काम सां.बा.वि. कडुन इतर योजनेतुन पुर्ण करण्यात आलेले आहे. सदर रस्त्याचे नाली व साईडपट्टीचे काम शिल्लक आहे व त्यासाठी 60लक्ष अंदाजीत खर्च अपेक्षीत आहे. तसेच उर्वरीत 2 रस्त्यापैकी नंदीग्राम सोसायटी ते मालटेकडी रेल्वे स्टेशन या रस्त्याचे 300 मी नालीचे व आनंदनगर ते सुंदरनगर ते रस्ता क्र. 44 पर्यंतच्या रस्त्याचे एकाबाजुन 300 मी लांबीतील काम शिल्लक असुन उपरोक्त शिल्लक कामाकरीता अंदाजे रु. 45.82 लक्ष खर्च अपेक्षित आहे. याशिवाय मा. आयुक्त, उपायुक्त, कार्यकारी अभियंता व स. सदस्य यांचे सुचनेनुसार झुणका भाकर केंद्र ते इनकम टॅक्स कॉलनी या रस्त्यावरील वाहतुक वर्दळ विचारात घेता सुरळीत वाहतुकीच्या दृष्टीने पर्यायी रस्ता म्हणुन सदरील रस्त्यास समांतर असणारा 750 मी. लांबीतील रस्त्याचे डांबरीकरण हाती घेणे आवश्यक आहे. सदरील वाढीव काम संबंधीत कंत्राटादाराकडुन मंजुर दरावर निविदा कलम 38 अंतर्गत अंतर्भुत बाबीच्या परिमाणात वाढ देय करुन हाती घेण्याची व त्यावरील होणा-या रु. 45.56 लक्षाच्या खर्चास मान्यता मिळावी.

3. पॅकेज 2ब मध्ये एकुण 10 रस्ते अंर्तभुत असुन त्यापैकी 5 रस्त्यांचे काम पुर्ण करण्यात आलेले असुन उर्वरीत रस्त्यापैकी (अ) गाडेगाव भाग -1 या रस्त्याचे 200 मी लांबीतील नाली व रस्ता डांबरीकरण व पुर्ण लांबीतील बीसी लेयर चे काम बाकी होते, (ब) बरकत कॉम्पलेक्स ते सावरीकर दवाखाना या रस्याचे एका बाजुचे बीसी लेयरचे काम शिल्लक आहे. (क) एसबीएचबँक ते एनटीसी मील या रस्त्याचे 300 मी लांबीतील नाली व 300 मी लांबीतील एका बाजुच्या साईड पट्टीचे काम शिल्लक आहे. (ड) भोजालाल गवळी ते किल्ला या रस्त्याचे काम साबांविभागाकडुन इतर योजनेतुन हाती घेऊन सी.सी. पुर्ण केले होते परंतु पृष्ठभाग खराब झाल्यामुळे यावर बीसी करणे जरुर आहे. व सदरील कामाकरीता 10 लक्षाचा खर्च अपेक्षीत आहे. (ई) मुजाम प्रेस ते जुना गंज या संपुर्ण रस्त्याचे काम ड्रेनेज लाईन काम हाती न घेतल्यामुळे अपुर्ण असल्याने पुर्ण करणे बाबत आढावा बैठकीत सुचित करण्यात आलेले आहे.

सदरील पॅकेज 2ब मधील 1. गाडेगाव भाग-1 व मिल्लतनगर रस्त्याच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी मा. आयुक्त, उपायुक्त, कार्यकारी अभियंता, उपअभियंता, क. अभियंता व स. सदस्य यांचे समवेत करण्यात आली. त्यावेळी केलेल्या सुचनेनुसार गाडेगाव भाग 1 अंतर्गत रस्त्याचे यापुर्वी बीएम लेयरपर्यंत काम करण्यात आलेले होते परंतु सदरील रस्त्याच्या कामानंतर पापुवजनि विभागाकडुन water supply Line व मलनिःसारण लाईन टाकण्याचे काम हाती घेतल्यामुळे पुर्ण रुंदीतील रस्ता नादुरुस्त व वाहतुकीच्या दृष्टीने योग्य नसल्यामुळे पुर्ण रुंदीत रस्त्याचे Restoration करणे आवश्यक आहे. तसेच 785 मी. लांबीतील रस्त्याच्या Rcc pipe सह नालीचे काम हाती घेण्यात आलेले होते. परंतु सदरील मुख्य रस्त्याच्या नालीच्या कामानंतर लगतच्या रस्त्याच्या नालीचे काही प्रमाणात काम झालेले आहेत. परंतु मुख्य रस्त्यावरील नालीची Invert Level वर असल्यामुळे लगतच्या रस्त्याच्या नालीतुन पाणीनिचरा (**B.C. Soil settlement** मुळे) योग्य पध्दतीने होत नसल्यामुळे लगतच्या परिसरात मोठया प्रमाणावर (**water Logging**) पाणी पावसाळयात साचते. पाण्याचा निचरा योग्य पध्दतीने होण्याकरीता रस्त्याच्या यापुर्वीच्या केलेल्या **Rcc pipe** नालीचे कामाऐवजी योग्य Invert **Level** घेवुन पुनश्च **Rcc** नालीचे काम हाती घेणे आवश्यक आहे. सदरील रस्त्याचे **Restoration व Rcc** नालीचे वाढीव काम संबंधीत कंत्राटदाराकडुन पुर्वीच्या मंजुर दरावर निविदा कलम 38 अंतर्गत अंर्तभुत बाबीच्या परिमाणात वाढ देय करुन हाती घेण्याची व त्यावरील होणा-या वाढीव खर्च रु. 24065183/- व

मुळ निविदेतील शिल्लक कामावर होणारा खर्च रु. 3662712/- इतक्या रक्कमेस मान्यता मिळावी. याशिवाय 2ब पॅकेज मधील मिल्लतनगर रस्त्याचे काम यापुर्वी हाती घेण्यात आले होते. परंतु ड्रेनेज लाईनच्या कामामुळे तसेच अतिवृष्टीमुळे खराब झालेला पृष्ठभाग इ. कारणांमुळे सदरील रस्त्याचे काही प्रमाणात Restoration व बीसी लेयर चे काम हाती घेणे आवश्यक आहे. तसेच नालीचे Laying करणे आवश्यक आहे. याशिवाय या रस्त्यावरील एका बाजुच्या 300 मी लांबीतील नालीचे शिल्लक काम करणे आवश्यक आहे. सदरील रस्त्याचे काही प्रमाणात Restoration व BC Layer चे काम व Rcc pipe नाली **Laying इ.**वाढीव काम संबंधीत कंत्राटदाराकडुन मंजुर दरावर निविदा कलम 38 अंतर्गत अंर्तभुत बाबीच्या परिमाणात वाढ देय करुन हाती घेण्याची व त्यावरील होणा-या वाढीव खर्च रु. 8658168/- इतक्या रक्कमेस मान्यता व्हावी.

पॅकेज 2ब मधील उर्वरीत रस्त्याकरीता मुळ निविदेतील शिल्लक रस्त्याची कामे हाती घेण्याकरीता एकुण रु.13019308/- व वाढीव कामाकरीता एकुण रु. 36333129/-इतका खर्च अपेक्षित आहे, त्यास मान्यता मिळावी.

तरोडा पॅकेज 3 मध्ये एकुण 13 रस्त्यांची काम असुन त्यापैकी आजमितीस 2 रस्त्यांची कामे पुर्ण करण्यात आलेली आहेत. व 2 कामे बीएसयुपी योजनेअंतर्गत हाती घेवुन पुर्ण करण्यात आल्यामुळे वगळण्यात आलेली आहेत. सदरील पॅकेज मधील 11 रस्त्याच्या शिल्लक कामाकरीता एकुण खर्च रु. 9,72,54,493/- अपेक्षीत आहे. याशिवाय सदरील पॅकेज मधील 11 रस्त्यापैकी रस्ता क्र. बीके -1, बीके-2, बीके-3, बीके-4, बीके-6, बीके-11, बीके-12 या रस्त्याची कामे यापुर्वी काही प्रमाणात बीएम लेवल पर्यंत डांबरीकरण करण्यात आलेली होती. परंतु तरोडा भागातील मंजुर पापु व मलनिःसारण योजने अंतर्गत सदरील रस्त्यावर ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम हाती घेण्यात आल्यामुळे सदरील रस्त्यांचे Restoration करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरील रस्त्याच्या Restoration अंतर्गत अंतर्भुत बाबीच्या परिमाणात वाढ अपेक्षीत आहे. सदरील वाढीव काम संबंधीत कंत्राटदाराकडुन मंजुर दरावर निविदा कलम 38 अंतर्गत अंतर्भुत बाबीच्या परिमाणात वाढ देय करुन हाती घेण्याची व त्यावरील होणा-या रु. 26454493/- खर्चास मान्यता मिळावी.

एकंदरीत मंजुर प्रकल्पांतर्गत खालील तक्त्याचे अवलोकन व्हावे.

मंजुर प्रकल्पानुसार सद्यःस्थितीचे आर्थिक चित्रण

| पॅकेजचे नाव क्रमाक | मंजुर प्रकल्प किंमत(कोटीत) | स्वीकृत निविदा किंमत (कोटीत) | आजपर्यंत झालेला खर्च (कोटीत) | निविदेतील शिल्लक कामाकरीता लागणारा अपेक्षित खर्च (कोटीत) | मुळ निविदेशिवाय वाढीव कामाकरीता लागणारा खर्च(कोटीत) | सुधारीत संभाव्य एकुण खर्च (कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|
| **पॅकेज 1 तरोडा** | 29.42 | 30.19 | 25.72 | - | - | 25.72 |
| **पॅकेज 2अ** | 36.31 | 16.97 | 13.23 | 1.15 | 0.46 | 14.84 |
| **पॅकेज 2ब** | | 21.75 | 18.895 | 1.30 | 3.63 | 23.82 |
| **पॅकेज 3** | 22.50 | 24.79 | 17.085 | 9.72 | 2.64 | 29.45 |
| **विद्युतपोल शिफटींग** | -- | -- | 2.02 | 0.08 | -- | 2.10 |
| **एकुण** | 88.23 | 93.70 | 76.95 | 12.25 | 6.74 | 95.93 |
| **प्रकल्प सल्लागार फीस** | | | | | | 4.53 |
| **एकुण** | **88.23** | **93.70** | **76.95** | **12.25** | **6.74** | **100.46** |

उपरोक्त तक्त्यानुसार शासननिर्णयानुसार मंजुर प्रकल्प किंमत रु. 88.23 कोटी इतकी आहे. स्थायी समितीने ठराव क्र. 104 दि. 02.08.2011 अन्वये उपरोक्त मंजुर प्रकल्पातील पॅकेज 1, 2अ, 2ब व 3 च्या एकुण रु. 93.70 कोटीच्या निविदा स्वीकृती किंमतीस मान्यता प्रदान केलेली असुन त्यानुसार निविदा मंजुरी आदेश क्र. नांवाशमनपा/नगरोत्थान/482/011 दि. 24.08.2011 अन्वये कामाच्या निविदा उल्लेखीत दरानुसार मंजुर करण्यात येवुन मंजुर दरानुसार होणा-या अतिरिक्त खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्रदान केलेली आहे. आजपर्यंत कामावरील मंजुर अतिरिक्त बाबी विद्युतीकरणसह झालेला खर्च रु. 76.95 कोटी मुळ निविदेतील शिल्लक कामावरील अपेक्षीत खर्च रु. 12.25 कोटी व वाढीव कामाकरीता लागणारा अपेक्षीत खर्च रु. 6.74 कोटी असा एकुण रु. 95.93 कोटी व याशिवाय प्रकल्प सल्लागाराची फीसवर झालेला खर्च रु. 4.53 कोटी इतका होत असुन असा एकुण रु. 100.46 कोटी होत आहे. जे की पुर्वीच्या प्रशासकीय मान्यता प्राप्त रक्कमेपेक्षा 10 टक्के जास्त असल्या कारणाने सुधारीत प्रशासकीय व आर्थिक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.02**

**उद्यान विभाग**

**कार्यालयीन प्रस्ताव**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत वृक्षप्राधिकरण समिती स्थापने व वृक्ष अधिकारी यांची नेमणुक करणे बाबत**

**संदर्भ** :- महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जनत अधिनियम 1975 व सुधारणा 1975 चे कलम 3(1) व 5(1)

उपरोक्त विषयी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जनत अधिनिसयम 1975 व सुधारणा 1975 चे कलम 3(1) अन्वये कोणत्याही नागरी क्षेत्रात संबंधीत नागरी स्थानिक प्राधिकरण आपल्या सदस्यामधुन ते प्राधिकरण ठरवीत अशा रीतीने आणि अशा मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या कमीत कमी पाच आणि जास्तीत जास्त पंधरा व्यक्तीचे मिळुन बनलेले वृक्ष प्राधिकरण घटित करील अशी तरतुद आहे. संदर्भीय अधिनियमाचे कलम 3(2) नुसार विषयांकित वृक्ष प्राधिकरणाच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्त हे वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष असतील अशी तरतुद आहे. कलम 3(3) अन्वये प्रत्येक वृक्ष प्राधिकरणास ज्यांना वृक्षांचे रोपण आणि जतन या क्षेत्रातील विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघनाच्या प्रतिनिधींना वृक्ष प्राधिकरण सदस्य म्हणुन (नामनिर्देशित करता) येइल अशी तरतुद आहे. तसेच कलम 5(1) नुसार अधिनियमाच्या प्रायोजनासाठी वृक्ष अधिकारी म्हणुन नेमणुक करण्याची तरतुद आहे.

करिता महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनिपयम 1975 चे कलम 3(1) अन्वये नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यामधुन कमीत कमी 5 व जास्तीत जास्त 15 सदस्यांची `` **वृक्ष प्राधिकरण समिती** `` वर निवड करणे व उद्यान अधिक्षक श्री मिर्झा फरहतउल्ला बेग यांची वृक्ष प्राधिकारी म्हणून नेमणूक करणेस सर्वसाधारण सभेची मान्यता होणेस विनंती आहे.

**सभागृहनेता** वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करण्यासाठी मा. महापौर यांना अधिकार देण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच वृक्ष प्राधिकारी म्हणुन श्री मिर्झा फरहतउल्ला बेग यांची नेमणुक करण्यास मान्यता देण्यात यावी

**अ. सत्तार अ. गफुर** सभागृहनेता यांनी वृद्वा प्राधिकरण समिती गठीत करण्यासाठी मा. महापौर यांना अधिकार देण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** प्रशासनाने सादर केलेला प्रस्तावत वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करण्याचा जो प्रस्ताव सादर केला सभागृहनेता यांनी जो प्रस्ताव मांडला त्यानुसार सदरील समितीचे सदस्यांचे नांव देण्याचा अधिकार महापौर यांना देण्यास मान्यता देण्यात येते. तसेच वृक्ष प्राधिकारी म्हणुन श्री मिर्झा फरहतउल्ला बेग यांची नेमणुक करण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.101** **ठराव**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत वृक्षप्राधिकरण समिती स्थापने व वृक्ष अधिकारी यांची नेमणुक करणे बाबत**

**संदर्भ** :- महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जनत अधिनियम 1975 व सुधारणा 1975 चे कलम 3(1) व 5(1)

उपरोक्त विषयी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जनत अधिनिसयम 1975 व सुधारणा 1975 चे कलम 3(1) अन्वये कोणत्याही नागरी क्षेत्रात संबंधीत नागरी स्थानिक प्राधिकरण आपल्या सदस्यामधुन ते प्राधिकरण ठरवीत अशा रीतीने आणि अशा मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या कमीत कमी पाच आणि जास्तीत जास्त पंधरा व्यक्तीचे मिळुन बनलेले वृक्ष प्राधिकरण घटित करील अशी तरतुद आहे. संदर्भीय अधिनियमाचे कलम 3(2) नुसार विषयांकित वृक्ष प्राधिकरणाच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्त हे वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष असतील अशी तरतुद आहे. कलम 3(3) अन्वये प्रत्येक वृक्ष प्राधिकरणास ज्यांना वृक्षांचे रोपण आणि जतन या क्षेत्रातील विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघनाच्या प्रतिनिधींना वृक्ष प्राधिकरण सदस्य म्हणुन (नामनिर्देशित करता) येइल अशी तरतुद आहे. तसेच कलम 5(1) नुसार अधिनियमाच्या प्रायोजनासाठी वृक्ष अधिकारी म्हणुन नेमणुक करण्याची तरतुद आहे.

**करिता महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनिपयम 1975 चे कलम 3(1) अन्वये नवनिर्वाचित सन्माननीय सदस्यामधुन कमीत कमी 5 व जास्तीत जास्त 15 सदस्यांची नांवे निश्चित करुन देण्यासाठी मा. महापौर यांना अधिकार देण्यात येते तसेच `` वृक्ष प्राधिकरण समिती `` वर निवड करणे व उद्यान अधिक्षक श्री मिर्झा फरहतउल्ला बेग यांची वृक्ष प्राधिकारी म्हणून नेमणूक करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.**

**विषय क्रं.03**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड येथील शिक्षण आस्थापनेवर सालसन 2016-17 च्या संच मान्यतेनुसार 89 सह शिक्षक या संवर्गातील पदांची मान्यता असुन सद्यस्थितीत केवळ 52 सह शिक्षक कार्यरत आहेत. सह शिक्षकांच्या जागा रिक्त असल्यामुळे याचा थेट परिणाम हा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर पडत असल्याचे निदर्शनास येत असुन सदरील शाळेमध्ये विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे सहशिक्षकांच्या रिक्त असलेल्या जागा भरणे, हे अत्यंत गरजेचे आहे. त्याअनुषंगाने मनपा शिक्षण आस्थापनेवर एकतर्फी आंतर जिल्हा बदली पदस्थापनेने येण्यास राज्यातील अन्य नगरपरिषद, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेतील कार्यरत शिक्षकांचे वेळोवेळी प्रस्ताव दाखल होत आहेत. त्याअनुषंगाने मनपा शिक्षण आस्थापनेवर रिक्त असलेल्या सहशिक्षकांच्या जागेवर अनुशेषानुसार व शासनाच्या नियमाच्या अधिन राहुन आंतर जिल्हा बदलीने पदस्थापना दिल्यास रिक्त जागा भरल्या जाऊ शकतात व विद्यार्थ्यांचे नुकसान टाळता येऊ शकते. तसेच नावाशमनपा, नांदेड येथील विविध आस्थापनेवर रिक्त पदाकरिता इतर आस्थापनेवरील विविध संवर्गातील प्रवर्गात वर्ग-3 व वर्ग-4 च्या पदावर बदलीने येण्यासाठी व बदलीने इतर ठिकाणी जाण्यासाठी वेळोवेळी प्रस्ताव दाखल होत आहेत यामध्ये सहशिक्षक, लिपीक, शिपाई यांचा समावेश आहे.

करिता नावाशमनपा नांदेड येथील आस्थापनेवर विविध संवर्गातील प्रवर्गात व शासनाच्या नियमाच्या अधिन राहुन बदलीने पदस्थापना देण्यासाठी व मनपा सेवेत रुजु करुन घेण्यासाठी किंवा बदलीने जिल्हा परिषद, नगर परिषद किंवा मनपा मध्ये जाण्यास कार्यमुक्त करण्यासाठी आयुक्त नावाशमनपा नांदेड यांना महानगरपालिकेच्या वतीने प्राधिकृत करण्यास्तव सदरचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**सभागृहनेता** नावाशमनपा नांदेड येथील आस्थापनेवर प्राथमिक शिक्षक/शिक्षण सेवक या संवर्गातील प्रवर्गात व शासनाच्या नियमाच्या अधिन राहुन बदलीने पदस्थापना देण्यासाठी व मनपा सेवेत रुजु करुन घेण्यासाठी किंवा बदलीने जिल्हा परिषद, नगर परिषद किंवा मनपा मध्ये जाण्यास कार्यमुक्त करण्यासाठी मा. आयुक्त, मा. महापौर व उपमहापौर, श्री स. शेर अली म. महेबुब अली सदस्य, सौ. मोरे दिपाली संतोष सदस्या यांच्या मान्यतेने नांदेड महानगरपालिकेत रुजु करुन घेण्यासाठी प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात यावा.

**अ. सत्तार अ. गफुर** सभागृहनेता यांनी जो दुरुस्ती प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** सभागृहनेता यांनी नांदेड महानगरपालिकेत आस्थापनेवर प्राथमिक शिक्षक/शिक्षण सेवक या संवर्गातील प्रवर्गात व शासनाच्या नियमाच्या अधिन राहुन बदलीने पदस्थापना देण्यासाठी व मनपा सेवेत रुजु करुन घेण्यासाठी किंवा बदलीने जिल्हा परिषद, नगर परिषद किंवा मनपा मध्ये जाण्यास कार्यमुक्त करण्यास व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत रुजु करुन घेण्यास मा. आयुक्त, मा. महापौर, उपमहापौर, श्री स. शेर अली म. महेबुब अली सदस्य, सौ. मोरे दिपाली संतोष सदस्या यांच्या मान्यतेने प्राधिकृत करण्यासाठीची उपसुचनासह मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.102** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड येथील शिक्षण आस्थापनेवर सालसन 2016-17 च्या संच मान्यतेनुसार 89 सह शिक्षक या संवर्गातील पदांची मान्यता असुन सद्यस्थितीत केवळ 52 सह शिक्षक कार्यरत आहेत. सह शिक्षकांच्या जागा रिक्त असल्यामुळे याचा थेट परिणाम हा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर पडत असल्याचे निदर्शनास येत असुन सदरील शाळेमध्ये विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे सहशिक्षकांच्या रिक्त असलेल्या जागा भरणे, हे अत्यंत गरजेचे आहे. त्याअनुषंगाने मनपा शिक्षण आस्थापनेवर एकतर्फी आंतर जिल्हा बदली पदस्थापनेने येण्यास राज्यातील अन्य नगरपरिषद, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेतील कार्यरत शिक्षकांचे वेळोवेळी प्रस्ताव दाखल होत आहेत. त्याअनुषंगाने मनपा शिक्षण आस्थापनेवर रिक्त असलेल्या सहशिक्षकांच्या जागेवर अनुशेषानुसार व शासनाच्या नियमाच्या अधिन राहुन आंतर जिल्हा बदलीने पदस्थापना दिल्यास रिक्त जागा भरल्या जाऊ शकतात व विद्यार्थ्यांचे नुकसान टाळता येऊ शकते. तसेच नावाशमनपा, नांदेड येथील विविध आस्थापनेवर रिक्त पदाकरिता इतर आस्थापनेवरील विविध संवर्गातील प्रवर्गात वर्ग-3 व वर्ग-4 च्या पदावर बदलीने येण्यासाठी व बदलीने इतर ठिकाणी जाण्यासाठी वेळोवेळी प्रस्ताव दाखल होत आहेत यामध्ये सहशिक्षक, लिपीक, शिपाई यांचा समावेश आहे.

करिता नावाशमनपा नांदेड येथील आस्थापनेवर विविध संवर्गातील प्रवर्गात व शासनाच्या नियमाच्या अधिन राहुन बदलीने पदस्थापना देण्यासाठी व मनपा सेवेत रुजु करुन घेण्यासाठी किंवा बदलीने जिल्हा परिषद, नगर परिषद किंवा मनपा मध्ये जाण्यास कार्यमुक्त करण्यास व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेस रुजु करुन घेण्यास मा. आयुक्त, यांच्या मान्यतेने प्राधिकृत करण्यास मान्यता मिळणे बाबतचा प्रशासनाचा प्रस्ताव आहे सदर प्रस्तावास खालील उपसुचना आल्या.

**<u>उपसुचना:-</u>** **सुचक :-** श्री स. विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृहनेता

**अनुमोदक** :- श्री अ. सत्तार अ. गफुर

प्रशासनाच्या प्रस्ताव मान्य तथापि यामध्ये मा. आयुक्त यांचे सोबत मा. महापौर, मा. उपमहापौर, श्री स. शेर अली म. महेबुब अली, सदस्य सौ. मोरे दिपाली संतोष सदस्या यांचे मान्यतेने प्राधिकृत करण्याची अशी उपसुचनेसह प्रशासकिय प्रस्ताव हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.04**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत श्री शांताराम सगणे जलतरणीका येथील डेक टाईल्स व जलतरणीकेतील टाईल्स नव्याने बसविणे**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत श्री शांताराम सगणे जलतरणीका येथील डेक टाईल्स व जलतरणीकेतील टाईल्स नव्याने बसविणेसाठी या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादरसूची 2017-18 नुसार रु. 76,67,200/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत श्री शांताराम सगणे जलतरणीका येथील डेक टाईल्स व जलतरणीकेतील टाईल्स नव्याने बसविणेसाठी लागणारी रक्कम रु. 76,67,200/- (अक्षरी रुपये शहात्तर लक्ष सदुसष्ठ हजार दोनशे फक्त) यास अर्थसंकल्प 2017-18 मधील श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम विकसीत करणे या लेखाशिर्षकातुन काम हाती घेणेस्तव तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च रुपये 76,67,200/- साठी प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

| | |
|---|---|
| **मुख्य लेखाशिर्ष** | **: श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम विकसीत करणे** |
| **एकुण तरतुद** | : रु. 3,00,00,000/- |
| **पुर्वी झालेला खर्च** | : रु. 1,96,97,433/- |
| **या कामावर होणारा खर्च** | : रु. 76,67,200/- |
| **शिल्लक रुपये** | : रु. 26,35,367/- |

**महापौर** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.103** **ठराव**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत श्री शांताराम सगणे जलतरणीका येथील डेक टाईल्स व जलतरणीकेतील टाईल्स नव्याने बसविणे**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत श्री शांताराम सगणे जलतरणीका येथील डेक टाईल्स व जलतरणीकेतील टाईल्स नव्याने बसविणेसाठी या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादरसूची 2017-18 नुसार रु. 76,67,200/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत श्री शांताराम सगणे जलतरणीका येथील डेक टाईल्स व जलतरणीकेतील टाईल्स नव्याने बसविणेसाठी लागणारी रक्कम रु. 76,67,200/- (अक्षरी रुपये शहात्तर लक्ष सदुसष्ठ हजार दोनशे फक्त) यास अर्थसंकल्प 2017-18 मधील श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम विकसीत करणे या लेखाशिर्षकातुन काम हाती घेणेस्तव तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च रुपये 76,67,200/- साठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

| | |
|---|---|
| **मुख्य लेखाशिर्ष** | **: श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडीयम विकसीत करणे** |
| **एकुण तरतुद** | : रु. 3,00,00,000/- |
| **पुर्वी झालेला खर्च** | : रु. 1,96,97,433/- |
| **या कामावर होणारा खर्च** | : रु. 76,67,200/- |
| **शिल्लक रुपये** | : रु. 26,35,367/- |

**विषय क्रं.05**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रं. 11 मधील रस्ता क्रं. 24 व 09 मधील अल्पसंख्यांक मुस्लीम बहुल भागात विकास कामे करणे

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रं. 11 मधील रस्ता क्रं. 24 व 09 मधील हैदरबाग-1, हैदरबाग-2, हैदरगार्डन, मरकस, लक्ष्मीनगर, गुलजारनगर, गुलशन कॉलनी, रहेमाननगर, इस्लामपुरा, गोदावरीनगर इत्यादी भागात खुप मोठया प्रमाणात नागरी रहीवास आहे सदरचा भाग सखल भाग असल्याने या ठिकाणी प्राथमिक सोयी सुविधा पुरविणे अतंतर्गत रस्ते नाली, नाले घेणे आवश्यक आहे. सदर भागाची प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता सदर भागात प्रमुख्याने दोन मोठे नाले व रस्त्या लगतच्या नाल्या प्राधान्याने करणे तसेच रस्त्याचे काम हाती घेणे आवश्यक असल्यामुळे त्यासाठी खालील प्रमाणे निधीची आवश्यक्ता आहे.

| | |
|---|---|
| 1) सिमेंट रस्ते करण | रु. 100.00 लक्ष |
| 2) रस्त्या लगत नाली करणे | रु. 100.00 लक्ष |
| 3) मोठे नाले | <u>रु. 150.00 लक्ष</u> |
| एकूण | रु. 350.00 लक्ष |

उपरोक्त प्रमाणे कामाकरिता अल्पसंख्यांक निधी अंतर्गत अनुदान प्राप्त करणेसाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याच्या मान्यतेस्तव सर्वसाधारण सभे समोर सादर.

**सभागृहनेता** सदरील प्रस्तावा सोबतच प्रभाग क्रं. 10 हा नंदिग्राम सोसायटी, फारुखनगर, महेबुबनगर, सैलानीनगर, दुरवेशनगर अल्पसंख्यांक भागात मोडत असल्याने सदरील प्रभागासाठी शासना मार्फत 350.00 लक्ष विकास कामे करण्यासाठी निधी प्राप्त करुन घेण्यास मान्यता देण्यात यावी.

**स. शेर अली** सभागृहनेता यांनी जो दुरुस्ती प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो त्यात सभागृहनेता यांनी जो दुरुस्ती उपसंचनासह मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.104** **ठराव**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रं. 11 मधील रस्ता क्रं. 24 व 09 मधील अल्पसंख्यांक मुस्लीम बहुल भागात विकास कामे करणे

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील प्रभाग क्रं. 11 मधील रस्ता क्रं. 24 व 09 मधील हैदरबाग-1, हैदरबाग-2, हैदरगार्डन, मरकस, लक्ष्मीनगर, गुलजारनगर, गुलशन कॉलनी, रहेमाननगर, इस्लामपुरा, गोदावरीनगर इत्यादी भागात खुप मोठया प्रमाणात नागरी रहीवास आहे सदरचा भाग सखल भाग असल्याने या ठिकाणी प्राथमिक सोयी सुविधा पुरविणे अतंतर्गत रस्ते नाली, नाले घेणे आवश्यक आहे. सदर भागाची प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता सदर भागात प्रमुख्याने दोन मोठे नाले व रस्त्या लगतच्या नाल्या प्राधान्याने करणे तसेच रस्त्याचे काम हाती घेणे आवश्यक असल्यामुळे त्यासाठी खालील प्रमाणे निधीची आवश्यक्ता आहे.

| | |
|---|---|
| 1) सिमेंट रस्ते करण | रु. 100.00 लक्ष |
| 2) रस्त्या लगत नाली करणे | रु. 100.00 लक्ष |
| 3) मोठे नाले | <u>रु. 150.00 लक्ष</u> |
| एकूण | रु. 350.00 लक्ष |

उपरोक्त प्रमाणे कामाकरिता अल्पसंख्यांक निधी अंतर्गत अनुदान प्राप्त करणेसाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव प्रशासनाने सादर करण्याचा प्रशासकिय प्रस्ताव आहे सदर प्रस्तावास खालील उपसुचना आल्या.

<u>**उपसुचना:-**</u> **सुचक :-** श्री स. विरेंद्रसिंघ गाडीवाले, सभागृहनेता

**अनुमोदक:-** श्री स. शेर अली म. महेबुब आली सदस्य

प्रशासनाच्या प्रस्ताव मान्य तथापि यामध्ये प्रभाग क्रं. 10 मधील नंदिग्राम सोसायटी, फारुखनगर, महेबुबनगर, सैलानीनगर, दुरवेशनगर हे भाग अल्पसंख्यांक भागात मोडत असल्याने सदरील भागात विकासाचे कामे करण्यासाठी शासना मार्फत रुपये 350.00 लक्षाची निधी प्राप्त करुन घेण्यात यावी अशी उपसुचनेसह प्रशासकिय प्रस्ताव हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.06** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका तर्फे वर्धापना दिनाचा कार्यक्रम दर वर्षी मार्चच्या शेवटचा आठवडा अथवा एप्रिलचा पहिल्या आठवडयात आयोजन करुन उत्कृष्ट सामाजीक कार्य करणा-या एका नागरीकांस नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका जीवन गौरव पुरस्कार देवुन सन्माननीत करणे बाबत.

**सुचक :-** स. विरेंद्रसिंघ गाडीवाले **अनुमोदक:-** आनंद चव्हाण

**सभागृह नेता** ज्यांचे पत्र येतील त्यांना स्वतंत्र ठराव करुन देण्यात यावा. 26 मार्च ला मनपाचा वर्धापन दिनआहे त्यासाठी मनपा कडून जीवन गौरव पुरस्काराचे आयोजन करावे यावर्षी पासुन सुरुवात करावी. मार्च अखेर असल्यामुळे एप्रीलच्या पहील्याकिंवा दुस-या आठवडयात कार्यक्रमाचे आयोजन करावे. जीवन गौरव समीती गठीत करण्यात यावी समीतीने नांदेड शहरातील जे नामांकीत कार्य करणारी व्यक्ती आहे त्या व्यक्तीचा सन्मान करण्यात यावा.

**आयुक्त** जिवन गौरव समीती ही मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली असावी. यामध्ये शहरातील मान्यवर लोक या समीतीत असावेत.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.105** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका तर्फे वर्धापना दिनाचा कार्यक्रम दर वर्षी मार्चच्या शेवटचा आठवडा अथवा एप्रिलचा पहिल्या आठवडयात आयोजन करुन उत्कृष्ट सामाजीक कार्य करणा-या एका नागरीकांस नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका जीवन गौरव पुरस्कार देवुन सन्माननीत करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.07** **प्रस्ताव**

मनपा हद्यीत गावठाण क्षेत्रात आकृषिक कर लागु नसतांना सुध्दा महापालिका मालमत्ता कराच्या मागणी बिलात आकृषिक कर लावण्यात आलेला आहे.

तरी सदर बाबतची तपशीलवार सविस्तर माहिती मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक :-** शबाना बेगम मो.नासेर, मो.साबेर चाऊस नासेर चाउस **अनुमोदक :-** अ.लतीफ अ.मजीद, कुरेशी रिहाना बेगम चाँद पाशा अब्दुल हफीज अब्दुल करीम

<u>**प्रशासकिय अभिप्राय**</u>

महाराष्ट्र जमीन महसुल संहिता 1966 मधील आकृषिक आकारणीच्या व वसुलीच्या प्रचलीत पध्दतीत सुधारणा करणे बाबत महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रं. एनएपी-1006/प्र.क्र.270/ल-5 दिनांक 05 फेब्रुवारी 2009 अन्वये राज्यातील सर्व महानगरपालिका हद्दीतील अकृषिक कर वसुलीचे काम त्या त्या संबंधीत महानगरपालिकेकडे सोपविले

असुन परिपत्रकातील तरतुद क्रं. 18 अन्वये अकृषिक कर आकारणीच्या वसुली व्यतीरिक्त इतर सर्व बाबी महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, 1966 मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी यांनीच करावयाच्या आहेत असे स्पष्ट केले आहे.

अकृषिक कर आकारणी करण्याचे काम जिल्हाधिकारी कार्यालयाने केले असुन त्यांच्या यादया सालसन 2009-10 मध्ये महानगरपालिकेस पुरविण्यात आल्या होत्या परंतु त्या यादीतील मालमत्ताधारक व महानगरपालिका रेकॉर्डवरील मालमत्ताधारकांचे नांवे जुळत नव्हती व त्यामुळे सर्व मालमत्ताधारकांना याकराची मागणी करणे अशक्य झाले होते.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अभिलेख्यातील खातेदार व महानगरपालिका मालमत्ता कराचे खातेदार यांचे नांवे जुळत नसल्याने मालमत्ताची पुनरकरआकारणी सालसन 2011-12 मध्ये झाल्यानंतर सर्व मालमत्ताचे जमीन क्षेत्रफळ महानगरपालिका अभिलेख्यात नोंदविले होते व त्याचा वापर प्रकारसुध्दा रेकॉर्डवर असल्याने तत्कालीन उपआयुक्त (महसुल) व उपविभागीय अधिकारी यांनी तलाठी व वसुली लिपीकांची संयुक्त बैठक घेऊन महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताधारकांची अद्यावयात यादी एक्सेल फार्मेट मध्ये तलाठी यांना देऊन त्यावरील लागणारा अकृर्षिक कर आकारणी करुन देण्याकरिता डेटा उपलब्ध करुन देण्यात आला होता, त्यावरील आकृर्षिक कर आकारणी संबंधीत तलाठीयांनी करुन दिल्यानंतर त्या डेटाबेस आधारे अकृर्षिक कराची मागणीची नोंद संगणक प्रणालीत करण्यात आली आहे. मालमत्ता धारकांच्या मागणी बिलामध्ये मालमत्ता करासह इतर सर्व आकारलेला कराची मागणी देऊन कराची वसुली करण्यात येत आहे व वसुली केलेल्या राज्य शासनाच्या इतर करासह अकृर्षिक वसुली करण्यात येत आहे व अकृषिक कराच्या वटावा पोटी 5 टक्के रक्कम कपात करुन ती उर्वरीत रक्कम शासकीय कोषागारात भरण्याचे काम लेखा विभागाकडून करण्यात येत आहे.

गावठाण हद्दीतील निवासी मालमत्तांना अकृषिक कर आकारला गेलेला दिसुन येत आहे. त्यामुळे सदरील अकृर्षिक कर मागणी कमी करणे, रद्द करणे हे नियमानुसार मा. जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत होते अपेक्षीत आहे. त्याकरिता गावठाण हद्दीतील निवासी मालमत्ताचा अकृर्षिक कर कमी करणेबाबत संबंधीत प्राधिकारी यांच्याकडे पाठविणेत येईल व त्यांच्याकडून मागणी सुधारीत करुन प्राप्त झालेस अकृर्षिक कर विरहीत मागणी बिले सालसन 2018-19 पासुन देण्यात येतील.

**सभागृह नेता** — गावठान भागात अक्रषीत कर लावण्यात येवू नये या संदर्भात मा. जिल्हाधिकारी, तहसील कार्यालय व मनपा अधिकारी यांची बैठक लावण्यात यावी.

**साबेर चाऊस** — मनपा हद्यीत गावठाण क्षेत्रात आकृषिक कर लागु नसतांना सुध्दा महापालिका मालमत्ता कराच्या मागणी बिलात आकृषिक कर लावण्यात आलेला असुन, महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रं. एनएपी-1006/प्र.क्र.270/ ल-5 दिनांक 05 फेब्रुवारी 2009 अन्वये नावाशमनपा हद्यीतील गावठाण भागातील निवासी मालमत्तांना अकृषिक कर आकारला गेलेला दिसुन येत आहे. त्यामुळे सदरील अकृर्षिक कर मागणी कमी करणे, रद्द करणे हे नियमानुसार मा. जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत होते अपेक्षीत आहे. त्याकरिता गावठाण हद्दीतील निवासी मालमत्ताचा अकृर्षिक कर कमी करुन त्यानुसार 2018-19 चे मागणी बिले मालमत्ता धारकास वितरण करुन त्याप्रमाणे कर वसुली करण्यास

**महापौर** — श्री साबेर चाऊस यांनी सुचविलेल्या दुरुस्तीनुसार स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.106** **ठराव**

मनपा हद्यीत गावठाण क्षेत्रात आकृषिक कर लागु नसतांना सुध्दा महापालिका मालमत्ता कराच्या मागणी बिलात आकृषिक कर लावण्यात आलेला असुन, महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रं. एनएपी-1006/प्र.क्र.270/ ल-5 दिनांक 05 फेब्रुवारी 2009 अन्वये नावाशमनपा हद्यीतील गावठाण भागातील निवासी मालमत्तांना अकृषिक कर आकारला गेलेला दिसुन येत आहे. त्यामुळे सदरील अकृर्षिक कर मागणी कमी करणे, रद्द करणे हे नियमानुसार मा. जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत होते अपेक्षीत आहे. त्याकरिता गावठाण हद्दीतील निवासी मालमत्ताचा अकृर्षिक कर कमी करुन त्यानुसार 2018-19 चे मागणी बिले मालमत्ता धारकास वितरण करुन त्याप्रमाणे कर वसुली करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.08** **प्रस्ताव**

मनपा हद्यीत जुन्या नांदेड शहरात कालापुल ते महात्मा गांधी रोड पर्यंत असलेल्या नाल्यावर 50 फुटाचा रस्ता बांधून रस्त्याच्या दोन्ही बाजुने 15 फुट खोल दुकाने बांधण्याबाबत दिनांक 18.02.2016 रोजी सर्वसाधारण सभेने ठराव क्रं. 263 अन्वये सर्वानुमते मंजुरी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने प्रशासना मार्फत या संबंधीत कार्यवाही करण्यात आली त्यासाठी मनपा सल्लागार ILFS यांना DPR तयार करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला होता तसेच नाला असल्या कारणाने पाठबंधारे विभाग नांदेड सदरचे कामा संबंधीत सर्वेक्षण करण्यासाठी कळविण्यात आले होते व त्या अनुषंगाने पाठबंधारे विभागा मार्फत सर्वेक्षण करुन मनपा कार्यालयास सकारात्मक अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यानंतर NAD-6 मधुन रुपये 1.69 कोटी मंजुर करुन A.S. कन्सट्रक्शन औरंगाबाद यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले होते.

तथापि सदरच्या कंत्राठदाराने कामाचे जुने दराचे असल्या कारणाने काम सुरुच केले नाही व सदरचे काम निधी आभावी प्रलंबित राहिले.

महात्मा गांधी रोड ते कालापुल पर्यंतचा रस्ता (हबीब टॉकीज नाला रस्ता) अत्यंत महत्वाचा रस्ता असणारा असुन सदरच्या रस्त्यामुळे ट्रॉफिक चा ताण कमी होणार आहे.

तरी सदरच्या रस्त्याची गरज लक्षात घेता महात्मा गांधी रोडला जोडणारा रस्ता कालापुल ते महात्मा गांधी रोड हा रस्ता 50 फुटाचा रुंद रस्ता बांधून रस्त्याच्या दोन्ही बाजुने 15 फुट खोल दुकाने बांधण्यास व सदरच्या रस्ता व दुकाने बांधकाम करत असतांना बाधीत होणा-या रहिवाशांना मनपा मालकीच्या कलस्टर बिल्डींग (घरकुल) मधील रिकामे घरकुल देण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक :-** खालसा प्रकाशकौर सुरजितसिंघ, सय्यद शेर अली **अनुमोदक** :- रावत भानुसिंह

**प्रशासकीय अहवाल**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकाक हद्यीतील महात्मा गांधी रोड ते काला पुल पर्यंतचे रस्ता करण्याचे काम अत्यंत गरजेचे असुन जुन्या नांदेड शहरातील यामुळे वाहतुकीची खूप मोठी समस्या सुटणार आहे सदर कामाचे परिपर्णू सर्व्हेक्षण नांदेड पाटबंधारे विभाग (सिंचन भवन) नांदेड यांचकडून पूर्ण करुन घेवुन सकारात्मक अहवाल प्राप्त झाल्यावर सदरचे काम हे रस्ता क्रमांक 4, 5 व 27 JNNURM अंतर्गत पूर्ण केलेले गुत्तेदार मे. A.S.CONSTRUCTION औरंगाबाद यांचेकडून JNNURM रस्ता क्रमांक 08 च्या उर्वरीत कामातून व बचत रक्कमेतुन कामाची तातडी व आवश्यकता पाहता विना निविदा पूर्वीच्या मंजुर दरावर करुन घेण्यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्याचा ठराव मनपा स्थायी समितीने ठराव क्रं. 13 दिनांक 17.05.2015 नुसार मंजुर केला व सदर कामाच्या रु. 1.70 कोटीच्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता देण्यात आली.

परंतु सदर कामाचे अंदाजपत्रक दरसुची 2011-12 प्रमाणे रुपये 1,69,16,255/- इतके असुन हे दर जुने असल्याने व न परवडणारे असल्याचे कारण दाखवुन मे. ए. एस. कन्स. औरंगाबाद यांनी हे काम करण्यास असमर्थता दर्शविली आहे. परिणामी हे काम अद्याप सुरु होवु शकले नाही.

या रस्त्याच्या प्रस्तावित जागेत कांही मनपा जमीन भाडेकरु असुन कांही भागात अतिक्रमणे झालेली असुन सदर रस्ता करावयाचा झाल्यास हि अतिक्रमणे काढावी लागणार आहे सद्यस्थितीत निधी उपलब्ध नाही.

**भानुसींह रावत** मनपाच्या जागेवर अतीक्रमण झालेले आहेत ते आपण काढणार की नाही याचा खुलासा करावा.

**दिपकसींह रावत** हा भाग अती संवेदनसील आहे. त्यामुळे अतीक्रमण काढण्यासाठी अडचणी निर्माण होवू शकतात. 2006, 2010 ला याबाबत ठराव झालेला आहे. 20.8.2013 ला ही ठराव झालेला आहे निधी अभावी या रस्ता करता आला नाही हा रस्ता 50 फुटाचा करावा अशी मागणी झालेली आहे महमद अली रोड पासुन ते काळया पुलाकडे जाणारा हा रस्त्यावरील जागा ही आपली आहे तीथे अतीक्रमण झालेले आहे ती काढण्यात यावे. व काला पुलापासुन ते गौतमनगरकडे जाणारा रस्ताही करण्यात यावा.

**भानुसींग रावत** अतीक्रमण प्रशासनाने काढावे. आमच्या येथे हींदु – मुस्लीम मीळुन राहतात. जातीय तनाव होण्याचा प्रश्न नाही माचच्या भागात जाण्यासाठी हा रस्ता छोटा आहे या विषयाला वेगळे वळन देण्यात येवू नये.

**दिपकसींह रावत** आम्ही या रस्त्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांकडून निधीची मागणी केली आहे. निधी आल्यावर आपण या रस्त्याचे काम करु.

**भानुसिंह रावत** सदरचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा रस्ता करण्यासाठी लागणारा निधी शासना मार्फत प्राप्त करुन घेवुन अथवा महानगरपालिकेने अंदाजपत्रकात तरतुद ठेवुन सदरचा काम तातडीने करावा व झालेला अतिक्रमण तात्काळ काढण्यास मान्यता देण्यात यावी

**स. शेर अली** श्री भानुसिंह रावत यांनी जो दुरुस्ती प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**महापौर** स. सदस्यांचा दुरुस्ती प्रस्ताव मंजुर करुन रस्त्यासाठी लागणारा निधी शासना मार्फत प्राप्त करुन घेण्यात यावा अथवा अंदाजपत्रकात तरतुद ठवुन सदरचा रस्ता करण्यात यावा तसेच सदरील रस्त्यावर झालेला अतिक्रमण तात्काळ काढण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.107** **ठराव**

मनपा हद्यीत जुन्या नांदेड शहरात कालापुल ते महात्मा गांधी रोड पर्यंत असलेल्या नाल्यावर 50 फुटाचा रस्ता बांधून रस्त्याच्या दोन्ही बाजुने 15 फुट खोल दुकाने बांधण्याबाबत दिनांक 18.02.2016 रोजी सर्वसाधारण सभेने ठराव क्रं. 263 अन्वये सर्वानुमते मंजुरी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने प्रशासना मार्फत या संबंधीत कार्यवाही करण्यात आली त्यासाठी मनपा सल्लागार ILFS यांना DPR तयार करण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला होता तसेच नाला असल्या कारणाने पाठबंधारे विभाग नांदेड सदरचे कामा संबंधीत सर्वेक्षण करण्यासाठी कळविण्यात आले होते व त्या अनुषंगाने पाठबंधारे विभागा मार्फत सर्वेक्षण करुन मनपा कार्यालयास सकारात्मक

अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यानंतर NAD-6 मधुन रुपये 1.69 कोटी मंजुर करुन A.S. कन्सट्रक्शन औरंगाबाद यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले होते.

तथापि सदरच्या कंत्राठदाराने कामाचे जुने दराचे असल्या कारणाने काम सुरुच केले नाही व सदरचे काम निधी आभावी प्रलंबित राहिले.

महात्मा गांधी रोड ते कालापुल पर्यंतचा रस्ता (हबीब टॉकीज नाला रस्ता) अत्यंत महत्वाचा रस्ता असणारा असुन सदरच्या रस्त्यामुळे ट्रॉफिक चा ताण कमी होणार आहे.

तरी सदरच्या रस्त्याची गरज लक्षात घेता महात्मा गांधी रोडला जोडणारा रस्ता कालापुल ते महात्मा गांधी रोड हा रस्ता 50 फुटाचा रुंद रस्ता बांधून रस्त्याच्या दोन्ही बाजुने 15 फुट खोल दुकाने बांधण्यास व सदरच्या रस्ता व दुकाने बांधकाम करत असतांना बाधीत होणा-या रहिवाशांना मनपा मालकीच्या कलस्टर बिल्डींग (घरकुल) मधील रिकामे घरकुल देण्यास मान्यता देण्यात येते. तसेच सदरचा रस्ता करण्यासाठी लागणारा निधी शासना मार्फत प्राप्त करुन घेवुन अथवा मनपा अंदाजपत्रकात तरतुद करुन रस्ता करण्यात यावा व सदरच्या रस्त्यावर झालेला अतिक्रमण तात्काळ काढण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.09** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील देगलुर नाका चौरस्ता व टायर बोर्ड चौरस्ता व खुदवाईनगर चौरस्ता हे नांदेड शहराबाहेर जाणा-या मुख्य रस्त्यावरील महत्वाचे चौक आहेत, या ठिकाणी नेहमीच लहान व अवजड वाहनांची वर्दळ असते, परंतु सद्यस्थिती हे तिन्ही चौकांची जागा ही अत्यंत अरुंद आहे, जे की या रस्त्यावरुन ये-जा करणा-या वाहनांच्या तुलनेत अत्यंत कमी क्षमतेचे आहे. ज्यामुळे या चौकांमध्ये नेहमरीच ट्रॉफिक जाम होण्याचे व अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे या तिन्ही चौकांची रुंदी वाढविणे आवश्यक असल्याने देगलुर नाका चौरस्ता व टायर बोर्ड चौरस्ता व खुदवाईनगर चौरस्त्याची एकूण रुंदी 200 फिट (परीघ) एवढी वाढविण्याकरिता निधी प्राप्त करणेसाठी जिल्हा नियोजन समितीकडे मंजुरीस्तव पाठविण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते.

**सुचक** :- अब्दुल सत्तार अब्दुल गफुर **अनुमोदक** :- अ. रशीद अ. गणी

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.108** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील देगलुर नाका चौरस्ता व टायर बोर्ड चौरस्ता व खुदवाईनगर चौरस्ता हे नांदेड शहराबाहेर जाणा-या मुख्य रस्त्यावरील महत्वाचे चौक आहेत, या ठिकाणी नेहमीच लहान व अवजड वाहनांची वर्दळ असते, परंतु सद्यस्थिती हे तिन्ही चौकांची जागा ही अत्यंत अरुंद आहे, जे की या रस्त्यावरुन ये-जा करणा-या वाहनांच्या तुलनेत अत्यंत कमी क्षमतेचे आहे. ज्यामुळे या चौकांमध्ये नेहमरीच ट्रॉफिक जाम होण्याचे व अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे या तिन्ही चौकांची रुंदी वाढविणे आवश्यक असल्याने देगलुर नाका चौरस्ता व टायर बोर्ड चौरस्ता व खुदवाईनगर चौरस्त्याची एकूण रुंदी 200 फिट (परीघ) एवढी वाढविण्याकरिता निधी प्राप्त करणेसाठी जिल्हा नियोजन समितीकडे मंजुरीस्तव पाठविण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.10** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 06 व 07 भागात नागरी मुलभूत सुविधा अंतर्गत सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (नागरी दलीतेत्तर) या शासन योजने अंतर्गत सदर भागात मलनिस्सारण लाईन अस्तित्वात नसल्याचे नागरीकांना अनेक समस्ये तोंड द्यावे लागत आहे .

सध्या केंद्र सरकार व राज्य सरकार यांचे मार्फत स्वच्छ शहर राबविणे करिता निधी उपलब्ध करुन स्वच्छते करिता युध्द पातळीवर योजना राबविण्यात येत आहे त्यानुसार या प्रभागात सालसन 2017-18 मध्ये करण्यात आलेल्या तरतुदीतुन नांदेड महापालिकेस निधी उपलब्ध करुन द्यावा त्यासाठी लागणा-या खर्चा रुपये 01.00 कोटीची निधी प्राप्त करुन घेण्यात मान्यता देते.

**सुचक**:- चव्हाण उमेशसिंघ, रायबोले ज्योती सुभाष **अनुमोदक**:- पाटील संगीता विठ्ठल, अ.अलीम खान जलील खान

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.109** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 06 व 07 भागात नागरी मुलभूत सुविधा अंतर्गत सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (नागरी दलीतेत्तर) या शासन योजने अंतर्गत सदर भागात मलनिस्सारण लाईन अस्तित्वात नसल्याचे नागरीकांना अनेक समस्ये तोंड द्यावे लागत आहे .

सध्या केंद्र सरकार व राज्य सरकार यांचे मार्फत स्वच्छ शहर राबविणे करिता निधी उपलब्ध करुन स्वच्छते करिता युध्द पातळीवर योजना राबविण्यात येत आहे त्यानुसार या प्रभागात सालसन 2017-18 मध्ये करण्यात आलेल्या तरतुदीतुन नांदेड

महापालिकेस निधी उपलब्ध करुन द्यावा त्यासाठी लागणा-या खर्चा रुपये 01.00 कोटीची निधी प्राप्त करुन घेण्यात हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.11** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत गुरुव्दारा ते मोहम्मद अली रोड पर्यंत समांतर दोन रस्ते आहे. परंतु बर्की चौक ते देगलुर नाका पर्यंत जाण्यास एकच रस्ता आहे ज्यामुळे नेहमी ट्राफिक जाम ची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे मुख्य गुरुव्दारा ते चौफाळा येथील संगत साहेब गुरुव्दारा पर्यंत जाण्यास भाविकांना ट्रॉफिकमुळे त्रास होत आहे.

तरी बाबासाहेब आंबेडकर चौक ते केळी मार्केट ते मॅफ्को ते पशु वैद्यकिय दवाखाना ते बंजारा हॉस्टेल शॉपिंग कॉम्पलेक्सच्या बाजुने ते बिलालनगर पर्यंतचा रस्ता हा महानगरपालिकेचा असुन सदरील रस्त्यावर अतिक्रमण करण्यात आलेला असुन सदरील अतिक्रमण काढून ते संगत साहेब गुरुव्दारा पर्यंतचा रस्ता बांधल्यास सदरील रस्त्यावर देगलुर नाका येथील ट्रॉफिकचा अनेक वर्षा पासुन प्रलंबीत असलेला प्रश्न सुटु शकेल त्यानुसार उक्त रस्ता तयार करण्यासाठी मंजुर विकास आरखडयातील रस्ता असुन सदर रस्त्यावर बहुतांशा शासकिय व महानगरपालिकेची जागा असुन उर्वरीत मालमत्त्या संपादन करुन सदरील रस्ता मोकळा करण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक**:- आयेशा बेगम शे. असलम (बाबुभाई खोकेवाला) **अनुमोदक**:- अ. सत्तार अ.गफुर, स.विरेंद्रसिंघ गाडीवाले, आनंद चव्हाण फारुख हुसेन बदवेल, स. शेर अली.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.110** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत गुरुव्दारा ते मोहम्मद अली रोड पर्यंत समांतर दोन रस्ते आहे. परंतु बर्की चौक ते देगलुर नाका पर्यंत जाण्यास एकच रस्ता आहे ज्यामुळे नेहमी ट्राफिक जाम ची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे मुख्य गुरुव्दारा ते चौफाळा येथील संगत साहेब गुरुव्दारा पर्यंत जाण्यास भाविकांना ट्रॉफिकमुळे त्रास होत आहे.

तरी बाबासाहेब आंबेडकर चौक ते केळी मार्केट ते मॅफ्को ते पशु वैद्यकिय दवाखाना ते बंजारा हॉस्टेल शॉपिंग कॉम्पलेक्सच्या बाजुने ते बिलालनगर पर्यंतचा रस्ता हा महानगरपालिकेचा असुन सदरील रस्त्यावर अतिक्रमण करण्यात आलेला असुन सदरील अतिक्रमण काढून ते संगत साहेब गुरुव्दारा पर्यंतचा रस्ता बांधल्यास सदरील रस्त्यावर देगलुर नाका येथील ट्रॉफिकचा अनेक वर्षा पासुन प्रलंबीत असलेला प्रश्न सुटु शकेल त्यानुसार उक्त रस्ता तयार करण्यासाठी मंजुर विकास आरखडयातील रस्ता असुन सदर रस्त्यावर बहुतांशा शासकिय व महानगरपालिकेची जागा असुन उर्वरीत मालमत्त्या संपादन करुन सदरील रस्ता मोकळा करण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.12** **प्रस्ताव**

तत्कालीन नगरपालिका कालावधीत सालसन 1994-95 पुनरकर आकारणीत केलेल्या कामाचा अतिकालीक भत्याची देय रक्कम नव्वद टक्के कर्मचा-यांना अदा करण्यात आली आहे. उर्वरीत दहा टक्के कर्मचा-यांना त्यांच्या देय रक्कमेच्या दहा टक्के रक्कम अदा केली व उर्वरीत रक्कम नगरपालिका प्रशासन संचालनालय मुंबई यांचे 24.12.1996 च्या परिपत्रका प्रमाणे देता येत नाही या सबबीखाली त्यांची देय रक्कम दिली नाही. वास्तविक सदर परिपत्रक देवु नये असे नमुद पण केलेले नाही.

त्यामुळे दहा टक्के राहिलेल्या कर्मचा-यांपैकी चार कर्मचा-यांना कामागार न्यायालय जालना येथे महानगरपालिके विरुध्द सदर रक्कम मिळणे बाबत दावा दाखल केला न्यायालयाने देय रक्कमेवर दहा टक्के व्याज दराने रक्कम देण्यात यावे असा निकाल देऊन महानगरपालिकेने नगरपालिका प्रशासन संचालनालय मुंबई यांचे दिनांक 24.12.1996 चे परिपत्रक रद्द केले.

या विरुध्द नांदेड महानगरपालिकेने उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे अपिल दाखल केले. उच्च न्यायालयाने कामगार न्यायालयाचा निकाल कायम ठेवला व या चार कर्मचा-यांची व्याजासहीत रक्कम न्यायालयात जमा करण्याचे आदेश दिले. नांदेड महानगरपालिकेने उच्च न्यायालयात रक्कम व्याजासहीत जमा केली. न्यायालयाने चारही कर्मचा-यांना सदर रक्कमेचे धनादेश दिले. तेंव्हाच वेळेवर रक्कम कर्मचा-यांना अदा केली असती तर व्याजाचा भुर्दंड महानगरपालिकेस झाला नसता. तरी सदरील भत्याची देय असलेले दहा टक्के कर्मचारी जवळपास सेवानिवृत्त झाले आहेत तसेच वेळोवेळी सदर रक्कम मिळणे बाबत विनंती करीत आहेत. तरी यातील बरेच कर्मचारी गंभीर रोगाने आजारी असल्याचे निदर्शनास आलेले आहे त्यामुळे त्यांना तात्काळ त्यांची देय असलेली रक्कम संबंधीत शिर्षकातुन (OVER & ABOVE) देण्यात यावी असे ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते समंत करते सदर ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक**:- रावत भानुसिंह गयादिनसिंह **अनुमोदक** :- चव्हाण आनंदराव शंकरराव, स.संदीपसिंग शंकरसिंग गाडीवाले

**प्रशासकिय अहवाल**

का.आ. क्रं. 21272 दि. 30.03.1996 नुसार तत्कालीन नांदेड नगरपालिकेत सालसन 1994-95 या वित्तीय वर्षात नगरपालिका हद्यीतील मालमत्तेचे पुनर कर आकारणीचे काम कर्मचा-यांकडून कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त करुन घेतल्याबाबत अतिकालीक भत्ता मंजुर करण्यात आला. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर अतिकालीक भत्याचे एकूण देयकापैकी 10 टक्के रक्कम कर्मचा-यांना वाटप करण्यात आलेली असुन कांही कर्मचा-यांना पूर्ण देयक अदाई करण्यात आले आहे.

तदनंतर अतिकालिक भत्याची रक्कम नगरपालिका प्रशासन संचालनालय मुंबई यांचे दि. 24.12.1996 रोजीच्या परिपत्रकात किमान वेतन अधिनियम 1938 मधील तरतुदीनुसार अतिकालीक भत्ता नियमित कर्मचा-यांना अनुज्ञेय नसल्याची तरतुद असल्याने उर्वरीत अतिकालीक भत्ता संचिका बंद करण्यास आयुक्तांनी मान्यता प्रदान केली आहे.

सदर प्रकरणी 04 सेवानिवृत्त कर्मचा-यांनी औद्योगीक न्यायालय जालना येथे याचिका दाखल केली होती. सदर कार्यवाही मध्ये मनपाने नगरपालिका प्रशासन संचालनालय मुंबई यांचे दि. 24.12.1996 परिपत्रक दाखल केले होते परंतु औद्योगीक न्यायालयाने वरील कर्मचा-यांना अतिकालीक भत्ता व्याजासहित देण्याबाबत आदेश दिला. सदर आदेशाविरुध्द मनपा मार्फत उच्च न्यायालयात अपिल दाखल केले असता मा. उच्च न्यायालयाने देखील सदर अपिल फेटाळून कर्मचा-यांना अतिकालीक भत्याची रक्कम व्याजासह देण्याबाबत निकाल दिली त्यानुसार त्यांना अतिकालीक भत्ता दिलेला आहे.

अतिकालीक भत्याचे प्रकरण सालसनस 1994-95 चे आहे प्रस्ताव 23 वर्षापुर्वीचा असल्यने वरील परिपत्रकानुसार देय होणार नाही.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्रं.111** **ठराव**

तत्कालीन नगरपालिका कालावधीत सालसन 1994-95 पुनरकर आकारणीत केलेल्या कामाचा अतिकालीक भत्याची देय रक्कम नव्वद टक्के कर्मचा-यांना अदा करण्यात आली आहे. उर्वरीत दहा टक्के कर्मचा-यांना त्यांच्या देय रक्कमेच्या दहा टक्के रक्कम अदा केली व उर्वरीत रक्कम नगरपालिका प्रशासन संचालनालय मुंबई यांचे 24.12.1996 च्या परिपत्रका प्रमाणे देता येत नाही या सबबीखाली त्यांची देय रक्कम दिली नाही. वास्तविक सदर परिपत्रक देवु नये असे नमुद पण केलेले नाही.

त्यामुळे दहा टक्के राहिलेल्या कर्मचा-यांपैकी चार कर्मचा-यांना कामागार न्यायालय जालना येथे महानगरपालिके विरुध्द सदर रक्कम मिळणे बाबत दावा दाखल केला न्यायालयाने देय रक्कमेवर दहा टक्के व्याज दराने रक्कम देण्यात यावे असा निकाल देऊन महानगरपालिकेने नगरपालिका प्रशासन संचालनालय मुंबई यांचे दिनांक 24.12.1996 चे परिपत्रक रद्द केले.

या विरुध्द नांदेड महानगरपालिकेने उच्च न्यायालय खंडपिठ औरंगाबाद येथे अपिल दाखल केले. उच्च न्यायालयाने कामगार न्यायालयाचा निकाल कायम ठेवला व या चार कर्मचा-यांची व्याजासहीत रक्कम न्यायालयात जमा करण्याचे आदेश दिले. नांदेड महानगरपालिकेने उच्च न्यायालयात रक्कम व्याजासहीत जमा केली. न्यायालयाने चारही कर्मचा-यांना सदर रक्कमेचे धनादेश दिले. तेंव्हाच वेळेवर रक्कम कर्मचा-यांना अदा केली असती तर व्याजाचा भुर्दंड महानगरपालिकेस झाला नसता. तरी सदरील भत्याची देय असलेले दहा टक्के कर्मचारी जवळपास सेवानिवृत्त झाले आहेत तसेच वेळोवेळी सदर रक्कम मिळणे बाबत विनंती करीत आहेत. तरी यातील बरेच कर्मचारी गंभीर रोगाने आजारी असल्याचे निदर्शनास आलेले आहे त्यामुळे त्यांना तात्काळ त्यांची देय असलेली रक्कम संबंधीत शिर्षकातुन (OVER & ABOVE) देण्यात यावी असे ही सर्वसाधारण सभा सर्वानुमते समंत करते सदर ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.13** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 06 मध्ये Y पाईन्ट कनेक्टींग रोड ते रेस्टहाऊस पर्यंतच्या रस्त्याचे काम विशेष रस्ते अनुदान मधुन करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- महेश कनकदंडे **अनुमोदक**:- दुष्यंत सोनाळे

**किशोर स्वामी** हा एकाच प्रभागाचाविषय नसुन शहरातील इतर अनेक रस्त्याचाविचार करुन हा ठराव पास करावा. सुधारीत करुन पास करण्यात यावा.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्रं.112** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत प्रभाग क्रं. 06 मध्ये Y पाईन्ट कनेक्टींग रोड ते रेस्टहाऊस पर्यंतच्या रस्त्याचे काम विशेष रस्ते अनुदान मधुन करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.14** **प्रस्ताव**

ऐजाज अ. रऊफ नदाफ रा. पार्डी ता. अर्धापुर याला त्यांने केलेल्या शोर्या बदल भारतातील अति. प्रतिष्ठित राष्ट्रपती पुरस्कार भारताचे महामहीम राष्ट्रपती यांचे हस्ते दिल्ली येथे देण्यात आला आहे.

आपल्या जिल्हयातील सामान्य कुटूंबातील विद्यार्थ्यास हा पुरस्कार मिळणे म्हणजे आपल्या करिता अभिमानाची बाब आहे. तेंव्हा ऐजाज अ. रऊफ नदाफ यांना येणा-या वर्धापना दिना निमित्त होणा-या कार्यक्रमास सन्मानाने निमंत्रीत करुन बोलावन यथोच्चित सत्कार करणे बाबत.

**सुचक**:- सौ. जयश्री निलेश पावडे, अ. सत्तार अ. गफुर **अनुमोदक**:- सौ. कविता संतोष मुळे, अ. शमीम अब्दुल्ला साब

**सभागृह नेता** एजाजला राष्ट्रपतीने सन्मानीत केले आहे आहे तेव्हा त्याला मनपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करणार आहोत त्या कार्यक्रमात सन्मानीत करावे.

**जयश्री पावडे** मनपाच्या वतीने काही मानधन देता येते ते पाहावे त्याचे जे धाडस केले आहे ते गौरवास्पद आहे त्याला आर्थीक मदत देण्यात यावी.

**शमीम अब्दुल्ला** मनपाच्या कार्यक्रमात त्या सन्मानीत करुन आर्थीक मदत म्हणुन एक लाख निधी देण्यात यावा.

**महापौर** स. सदस्यांचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.113** **ठराव**

ऐजाज अ. रऊफ नदाफ रा. पार्डी ता. अर्धापुर याला त्यांने केलेल्या शोर्या बदल भारतातील अति. प्रतिष्ठित राष्ट्रपती पुरस्कार भारताचे महामहीम राष्ट्रपती यांचे हस्ते दिल्ली येथे देण्यात आला आहे.

आपल्या जिल्हयातील सामान्य कुटूंबातील विद्यार्थ्यास हा पुरस्कार मिळणे म्हणजे आपल्या करिता अभिमानाची बाब आहे. तेंव्हा ऐजाज अ. रऊफ नदाफ यांना येणा-या वर्धापना दिना निमित्त होणा-या कार्यक्रमास सन्मानाने निमंत्रीत करुन बोलावन यथोच्चित सत्कार करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.15** **प्रस्ताव**

**सौ. सुनंदा सुभाष पाटील, नगरसेविका प्रभाग क्रं. 1-ब तरोडा (खु)** यांचे पत्र दिनांक 20.12.2017 अन्वये प्राप्त दिनांक 12.02.2018 अन्वये संबंधीत नगरसेविका यांनी आपल्या पत्रात मला कांही अत्यंत आवश्यक खाजगी कामा निमित्त अमेरीका येथे स्थित माझ्या मुलाकडे जाणे आवश्यक आहे. ज्यामुळे मला पुढील 03 ते 04 महिणे नांदेड येथे राहणे शक्य नाही.

तरी मला नियमानुसार महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने अमेरीका येथे जाण्यासाठी व महानगरपालिकेत पुढील 03 ते 04 महिणे अनुपस्थित राहण्याची परवानगी देण्यात यावी ही विनंती असे पत्र मा. महापौरांना दिलेले आहेत सदरील पत्रावर मा. महापौर यांनी सदरची पत्राची नोंद घेणे असे पृष्ठांकण केलेले आहे. करिता मनपा सर्वसाधारण सभेचे सदरील पत्राची नोंद घेणे बाबत.

**महापौर** सौ. सुनंदा सुभाष पाटील नगरसेविका प्रभाग क्रं. 1-ब तरोडा खु हे विदेशात अमेरीका येथे मुलाकडे जास्त असल्याने त्यांना 3-4 महिण्यासाठी महासभेत उपस्थित राहणार नसल्याने त्यांना अनुपस्थित राहण्यास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.114** **ठराव**

**सौ. सुनंदा सुभाष पाटील, नगरसेविका प्रभाग क्रं. 1-ब तरोडा (खु)** यांचे पत्र दिनांक 20.12.2017 अन्वये प्राप्त दिनांक 12.02.2018 अन्वये संबंधीत नगरसेविका यांनी आपल्या पत्रात मला कांही अत्यंत आवश्यक खाजगी कामा निमित्त अमेरीका येथे स्थित माझ्या मुलाकडे जाणे आवश्यक आहे. ज्यामुळे मला पुढील 03 ते 04 महिणे नांदेड येथे राहणे शक्य नाही.

तरी मला नियमानुसार महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने अमेरीका येथे जाण्यासाठी व महानगरपालिकेत पुढील 03 ते 04 महिणे अनुपस्थित राहण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते नोंद घेते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**महापौर** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामळे शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात येईल.
शेवटी राष्ट्रीगित म्हणण्यात आले.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **नगरसचिव** | **महापौर** |
| **नावाशमनपा नांदेड** | **नावाशमनपा नांदेड** |